ते अमानव

चंद्रशेखर पुरंदरे



कासव

कासव तीरावर आले तोपर्यन्त गुडुप अंधार झाला होता. त्याच्यापुढे बराच प्रवास होता आणि त्याच्या गतीने सगळी रात्र चालण्यातच गेली असती. पण त्याला पर्याय नव्हता. देवाचा अवतार असल्याने काम करणे आवश्यक होते. त्यासाठी जरूर पडेल तशी सोन्याची काही बिस्किटे त्याच्या पाठीच्या खाली होती. देवाच्या सांगण्याप्रमाणे, कासव जमिनीवर जात आहे. तेथे माणसे असतात. त्यांच्याशी त्याला व्यवहार करायला लागलेच, तर त्यांना फक्त सोन्याची भाषा कळते.

जरा अंतर चालल्यावर त्याच्या लक्षात आले की डावीकडून एक प्रचंड हिमनदी अतिशय संथ गतीने पण निश्चितपणे त्याच्या दिशेने येत आहे. बर्फाची थंडी जाणवू लागली होती. तेवढ्यात उजवीकडच्या जंगलातून एकदम डोळे दिपवणाऱ्या प्रकाशाने आसमंत उजळून निघाला. एका ज्वालामुखीचा स्फोट झाला होता. उंचच उंच ज्वाळा वर येत होत्या आणि ठिणग्यांचा पाऊस पडत होता. काळ्या धुराने काहीच दिसेनासे झाले आणि गुदमरण्याची वेळ आली. झाडेही पेटत चालली होती. आता कासव घाबरले. परत वळून पाण्यात शिरावे ही शक्यता नव्हती कारण कामासाठी वस्तीवर जाण्याचा आदेश होता.

हिमनदी आणि ज्वालामुखी या संकटांवर मात करण्यासाठी सोन्याच्या बिस्किटांचा उपयोग नव्हता.

ज्वालामुखीच्या उद्रेकाने जंगलातले प्राणी, पक्षी सैरभैर झाले. पक्षी प्रचंड होते. संख्येने आणि आकाराने. त्यातला एक कासवाजवळ आला आणि म्हणाला 'पटकन माझ्या पाठीवर बैस, तुला जायचे तेथे सोडतो'. कासवाने सुस्कारा टाकला की आता दोन्हीकडून येणाऱ्या आपत्तीत ते सापडणार नाही. पण पक्षाच्या पाठीवर 'पटकन' बसणे त्याला जमेना. जंगलातून पळून जाणारा एक गेंडा तेवढ्यात तेथे आला. तो कासवाला म्हणाला - मी तुला शिंगावर घेतो आणि या पक्ष्याच्या पाठीवर चढवतो. मग कासव पक्ष्यावर विराजमान झाले. निघण्याच्या आधी कासवाने एक बिस्किट गेंड्याला दिले. गेंड्याला ही काय वस्तू आहे ते कळेना. कासवाने खुलासा केला की हा अतिशय मौल्यवान धातूचा तुकडा आहे. बाजारात त्याची खूप किंमत होईल.'बाजार म्हणजे काय'?

'जाऊ दे , तू मदत केलीस त्याबद्दल आभारी आहे' कासव म्हणाले कारण एकतर 'बाजाराचा' खुलासा थोडक्यात सांगता येण्यासारखा नव्हता आणि पक्षीही अस्वस्थ होत होता.

मग दोघे जण उडाले. हिमनदीची थंडी आणि लाव्हाच्या, वणव्याच्या भयानक उष्णतेपासून लांब गेले.

दूरवर गेल्यावर खाली एक वस्ती दिसू लागली. पक्षी म्हणाला - तुला इथे सोडू का? कासव हो म्हणाले. उतरल्यावर परत कासवाने सोन्याचे बिस्किट देण्याचा प्रयत्न केला. पुन्हा गेंड्याबरोबर झाला तोच संवाद झाला आणि पक्षी उडून गेला.

त्या लहान वस्तीत रस्त्यावर दिवे नव्हते. ज्या घरांत दिवे होते, त्यांच्या खिडक्यांतून येणाऱ्या प्रकाशाचे तुकडे रस्त्यावर पडले होते. चार-पाच कुत्री जोराने भुंकत कासवाच्या मागे लागली. त्यांना एकतर हा प्राणी नवीन होता आणि गावात अनोळखी होता. जरा वेळ ती त्याच्या आजूबाजूला राहिली मग त्यांनी नाद सोडला. एक कुत्रा मात्र कासवाच्या बरोबर राहिला. देवाने कासवाला GPS दिला होता. त्यामुळे कासवाला नेमके घर सापडले. घर अंधारात होते. पण दार नुसतेच बंद होते, कुलूप नव्हते. त्या वस्तीत 'आम्ही घराला कुलूप लावत नाही' असा राहिवाश्यांना अभिमान होता. कुत्राही कासवाबरोबर घरात शिरला. घरात तीनच खोल्या होत्या. कॉम्प्युटर बाहेरच्या खोलीतच होता. कासवाचे काम कॉम्प्युटरवर होते. पण कॉम्प्युटर टेबलावर होता. तिथपर्यंत पोचणे कासवाच्या आवाक्याबाहेर होते. ते नुसतेच वर मान करून कॉम्प्युटरकडे बघत राहिले. कुत्रा शेजारी होताच. तो टेबलाला दोन पाय टेकून उभा राहिला. त्याला दुसऱ्याच्या मनातले ओळखण्याची सिद्धी असल्याने त्याने कासवाचा प्रॉब्लेम ओळखला. तो घराबाहेर गेला आणि एका खारीला घेऊन आला.

खार जात्याच चतुर होती. तिला कासवाने काय करायचे सांगितल्यावर ती लगेच उडी मारून टेबलावर गेली आणि कॉम्प्युटर चालू केला. तेव्हा एक प्रागतिक सरकार सत्तेवर असल्याने अशा छोट्या वस्तीपर्यंत इंटरनेट पोचले होते. कासवाला कॉम्प्युटरवरून सोशल मीडियाचे सगळे प्रोग्रॅम uninstall करायचे होते. आता प्रॉब्लेम आला कारण प्रत्येक प्रोग्रॅम uninstall करताना मालकाच्या मोबाइलवर OTP येणार होता. मालक तर तेथे नव्हता आणि मोबाइल त्याच्याबरोबर होता. मग खारीने OTP ईमेलवर येईल अशी तरतूद करून घेतली. मालकाचा ईमेल शोधला आणि मेलचा पासवर्डही. मग काम सुरू झाले. हे प्रोग्रॅम uninstall झाले. ते परत कधीही कॉम्प्युटरवर install करता येऊ नयेत अशी पाचरही खारीने मारून ठेवली. या सगळ्यात बराच वेळ गेला. म्हणजे कासवाचे काम खारीनेच केले. तिला दिवे लावण्याची जरूरी पडली नाही. कॉम्प्युटरचा प्रकाश पुरेसा होता.

आता काम झाल्याचे देवाला कळवले की कासव परतीच्या प्रवासाला लागणार होते. तेवढ्यात घरचे दिवे लागले.

दरम्यान कुत्रा गायब झाल्याचे कासवाच्या लक्षात आले. तो आता मालकाच्या अवतीभवती घोटाळत होता. खार तर काम झाल्याझाल्या अदृश्य झाली होती. मालक कासवाला बघून चकित झाला. मानवी प्रथेप्रमाणे कासव आपल्यापेक्षा लहान, मंद आणि जमिनीवर आहे, तसेच परका प्राणी आहे हे पाहून प्रथम त्याने अत्यंत असभ्य शिव्या हासडल्या; पण कासवाला शिव्या कळणार नाहीत हे लक्षात येऊन मग एक जोरदार लाथ कासवाला घातली. कासवाला इजा झाली नाही पण संताप आला. खरी मजा येणार ते मालकाला सगळे सोशल मीडिया कॉम्प्युटरवरून गेल्याचे कळल्यावर या विचाराने कासव सुखावले आणि घराबाहेर पडले.

बाहेर आल्यावर आपण सोन्याची एक-दोन बिस्किटे मालकाला द्यायला हवी होती असे त्याला वाटले; पण माणसांचा भरोसा नसतो. आणखी बिस्किटे हवीत म्हणून त्याने हव्यासाने कासवाची पाठही सोलली असती.

तेवढ्यात देववाणी झाली. देवाला कासवाने काम पूर्ण केल्याचे कळले होते. माणसापेक्षा कासवाचे आयुष्य दुप्पट तरी असते म्हणून देवाने या कामासाठी त्याची निवड केली होती. त्याने कासवाला सांगितले - 'ही तर सुरुवात आहे. पृथ्वीवरून सोशल मीडिया कायमचे गेले पाहिजेत. मी देव असलो तरी देशोदेशीची सरकारे व कॉर्पोरेट्स् माझ्या नियंत्रणात नाहीत. आपण हा प्रयोग करून पहिला. या माणसाच्या वर्तणुकीवर मी नजर ठेवीन. पुढचा कार्यक्रम म्हणजे आर्टिफिशिअल इंटेलिजन्स संपूर्ण नष्ट करणे. ते केव्हा हे तुला कळवेन. तू आहेस तेथे जवळच एक मोठे तळे आहे, तोपर्यन्त तू त्यात विहार कर.'



उंदीर

निवडणुका जवळ येत होत्या. सगळेच पक्ष हिरिरीने प्रचाराला लागले होते. काळे उंदीर विरुद्ध पांढरे उंदीर असे प्रमुख पक्ष असले तरी घुशी, चिचुंद्र्या यांचे छोटे पक्षही मैदानात होते. त्यात काळ्या उंदरांची एक मोठी सभा शहरामध्ये भरली होती. प्रमुख वक्ता त्या मूषकांच्यात अतिशय आवडता नेता होता. त्या जागी मोठ्या प्रमाणावर धान्याची गोदामे सुरू होणार होती. त्या गोदामातून धान्य पळवायचे हा एककलमी कार्यक्रम होता. त्यासाठी पक्ष धोरणे आखत होते.

वस्तुतः निराळ्या पक्षांच्या धोरणांत मूलतः फरक नव्हता. गोदामांजवळ मोठ्या प्रमाणात नवी बिळे करायची व त्यात 'आपले' कार्यकर्ते ठेवायचे हे प्रमुख धोरण. त्यासाठी कोणती जमीन 'आपली' म्हणून केव्हा बळकवायची हे पक्ष ठरवत असे. अर्थातच तीच जमीन प्रत्येक पक्षाला हवी असे. मतभेद त्यात होत. ही 'आमचीच' पूर्वापार जमीन आहे असा दावा प्रत्येक पक्ष करत होता. त्यामध्येही घुशी, चिचुंद्र्या हे प्राणी उंदरांच्या आधीपासून त्या भागात वास्तव्य करत होते. कित्येक गोदामे तर त्यांच्याच जमिनीवर उभारली जाणार होती. त्यामुळे अल्पसंख्याक असले तरी भूमिपुत्र म्हणून ते आपला हक्क सोडायला तयार नव्हते. पांढरे उंदीर पांढरे असल्याने स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ मानत. तर काळे उंदीर बहुसंख्य असले तरी त्यांच्यात अनेक गट होते. प्रत्येक गट आपल्या हितसंबंधांसाठी जागरूक असे. प्रसंगी काही गट पांढरे उंदीर किंवा घुशी किंवा चिचुंद्र्या यांच्याशी हातमिळवणी करत असत. हे संधान उघड असे किंवा छुपे.

त्यामुळे निवडणुकीचे राजकारण तापत होते,

या धामधुमीत एक नवीन बातमी आली. ती अफवा की वस्तुस्थिती हे कळत नव्हते. बातमीनुसार प्रत्येक गोदामाबाहेर पत्र्यांच्या शेड्स उभारण्यात येणार होत्या. त्यात मांजरे ठेवण्यात येणार होती. काही शेड्समधील मांजरे दिवसा बाहेर असणार होती तर उरलेली रात्री. त्यायोगे उंदरांवर आळा बसेल. या धोक्यापासून वाचण्यासाठी एक योजना सविस्तरपणे वक्ता सांगू लागला. उंदरांनी जमिनीतून लांब भुयारे रचावीत, भुयाराचे दुसरे तोंड गोदामात असेल. पॅलेस्टाइनमध्ये अशी भुयारे सापडत आहेत. त्यांची सुरुवात पॅलेस्टाइनमध्ये होते व दुसरे तोंड इजिप्तमध्ये असते. आपल्या सध्याच्या क्षेत्रातील उंदीर कमी पडण्याची शक्यता असल्याने बाहेरचे उंदीर आणावे लागतील. हे आपले अधिकृत धोरण असेल त्यामुळे या नव्या उंदरांना हीन किंवा परकीय मानू नये. त्यात अर्थातच काही खोडसाळ उंदीर असतील. त्यांच्याबद्दल आम्ही सत्तेवर आल्यावर आमच्या शासनाला त्वरित कळवावे. शासन त्यांना हद्दपार करेल व त्यांच्या निवासस्थानावर बुलडोझर फिरवेल. मूषकनायकाच्या या वक्तव्यावर टाळ्यांचा कडकडाट झाला. बुलडोझर फिरवण्याची कारवाई सगळ्यांनाच मंजूर होती. नेत्याने पुढे खुलासा केला की आपले प्रजोत्पादनही वाढवले पाहिजे. म्हणजे अधिक कार्यकर्ते कामासाठी उपलब्ध होतील. इतर प्राण्यांच्या तुलनेत आपले आयुष्य कमी असले तरी गर्भ राहिल्यापासून प्रसूतीपर्यंतचा काळही कमी असतो. हे आपल्याला उपयोगी आहे.

आता काय करायचे ते पाहू. गोदामात धान्याची पोती एकावर एक रचलेली असतील. शक्य असल्यास सगळ्यात वरच्या पोत्यापासून सुरुवात करा. एका उंदराचे काम झाल्यावर हे भोक उघडे राहील. म्हणून पोते त्याच्या

वरच्या बाजूला कोपऱ्यात कुरतडा आणि भोक पाडा म्हणजे धान्याची धार लागणार नाही व ते जमिनीवर फार सांडणार नाही.

प्रत्येक उंदराच्या गळ्यात एक छोटी पिशवी असेल. गोदामात गेल्यावर त्या पिशवीत धान्य ठेवायचे आणि लगेच भुयारातून मूळच्या ठिकाणी यायचे. पिशवी रिकामी करायला एक उंदीर असेल तो पिशवी रिकामी करून परत त्या उंदराच्या गळ्यात अडकवेल. मग पुढची फेरी सुरू. हे काम २४ तास चालेल. तीन शिफ्ट्स असतील. प्रत्येक कार्यकर्त्याची नोंद एका रजिस्टरमध्ये होईल. कामचुकारपणा सहन केला जाणार नाही. प्रत्येक शिफ्टच्या प्रत्येकाच्या फेऱ्या ठरलेल्या असतील. त्यापेक्षा कमी फेऱ्या झाल्यास दुसऱ्या दिवशी जास्तीच्या फेऱ्या कराव्या लागतील. आपल्याकडे लिंगभेद नाही. त्यामुळे तृतीयपंथीय आणि स्त्री-उंदरांनाही तेवढेच काम करावे लागेल. गर्भार, आजारी उंदरांना सवलत देण्यात येईल. त्यासाठी आपले आधारकार्ड घेऊन शासकीय डॉक्टर उंदराकडे जावे लागेल व त्याचे तसे पत्र सादर करावे लागेल.


कार्यक्रमाची अशी अंमलबजावणी सभेत विशद करण्यात आली. शेवटी सगळ्यांना ही योजना मान्य आहे का, असे विचारण्यात आले. जर काही शंका असतील तर आताच विचारा, एकदा ठराव पारित झाला की कोणालाही त्यातून बाहेर पडता येणार नाही, हेही स्पष्ट करण्यात आले.

लगेचच सभेत कुजबूज सुरू झाली आणि काही शेपट्या वर गेल्या. त्यातील एकाला प्रथम बोलण्याची परवानगी मिळाली. तो म्हणाला - ही तर चोरी आहे. आजवर आपण बहुधा हवे तेवढेच अन्न रोज वेळच्या वेळी मिळवतो. त्याचा प्रचंड साठा करत नाही. जमा केलेले अन्न भिंतीतील खाचांत, फर्निचरच्या मागे साठवतो. गरजेहून जास्त अन्न घेणे ही चोरी वाटते. माणसे ते करतात. आपण ते करावे का? ते अनैतिक वाटते. दुसरे म्हणजे, इतके धान्य आपण साठवणार कोठे?

नेता उत्तर देऊ लागला - आपण हा मार्ग स्वीकारण्याचे मुख्य कारण म्हणजे, अन्नाची टंचाई. गेली तीन वर्षे आपल्या प्रदेशात पाऊस नाही. दुष्काळाने पिके जळून तरी गेली किंवा येतच नाहीत. त्याचे कारण पर्यावरणाचे असंतुलन. ते वाढतच जाणार. आजवरची परिस्थिती निराळी होती. शेती बऱ्यापैकी नियमित उत्पादन करत असे. आज एकूण मानवी लोकसंख्या आणि शहरीकरणाचा वेग प्रचंड वाढत आहे. अशा परिस्थितीत पारंपरिक नीतीमत्ता मार्गदर्शन करू शकत नाही. आपण दूरदृष्टी ठेवायला हवी. आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी तजवीज करायला हवी

सवयीप्रमाणे नेत्याला आणखी बरेच बोलायचे होते. पण अचानक आकाशात गडगडाट झाला. मुसळधार पाऊस सुरू झाला. सगळे उंदीर कोरड्या आश्रयाच्या शोधात पळून गेले. आपली बिळे पाण्याने भरली तर राहायलाही जागा नसेल. पुढारी मंडळी त्यासाठी मदत करणार नाहीत. आणि बिळातच पाणी भरले तर भुयाराला सुरुवात तरी कोठून करणार? सभा अनौपचारिकरीत्या अचानक संपुष्टात आली.

काळजीपूर्वक तयार केलेल्या योजनेचा असा अनपेक्षित बोजवारा उडाला.



डुकरे

वराहनगर आणि सूअराबाद ही डुकरांची दोन नगर-राज्ये कमालीच्या दुश्मनीतून जन्माला आली आणि ती दुश्मनी त्यांनी कायम राखली. ही शेजारी असलेली

राज्ये. आधी दोन्ही मिळून एक मोठे राज्य होते तोपर्यन्त ते कोल्ह्यांची वसाहत होते. तेव्हाची प्रजा कोल्ह्यांच्या गुलामगिरीत होती. कोल्हे 'बाहेरचे'. म्हणून डुकरांनी त्यांना हाकलण्याचे ठरवले. त्यांनी कोल्ह्यांची रसद बंद केली. मग तेथे राज्य करण्यात कोल्ह्यांचा फायदा राहिला नाही आणि ते पळून गेले. दरम्यान प्रजेतील दोन प्रमुख गटांनी कोल्ह्यांवरचा राग एकमेकांवर काढायला सुरुवात केली. एकदा अशी प्रक्रिया सुरू झाली की तिला अंत रहात नाही. दोन्ही बाजूंना दुसऱ्यात अनेक दोष सापडू लागले, इतिहासाची आपल्याला सोयीस्कर अशी पुनर्रचना वारंवार होऊ लागली आणि प्रचंड हिंसाचारातून अखेर दोन राज्ये जन्माला आली. त्यांच्यात युद्धे झाली व कायम तणावपूर्ण वातावरण असे.

दोघांची आदर्शवादी घडण कालानुसार निराळ्या मार्गाने झाली. एक राज्य 'सामर्थ्य आहे चळवळीचे', 'एकी हेच बळ', 'संघटना बांधल्या पाहिजेत' अशा विचारसरणीचे झाले, तर दुसऱ्या राज्याने कोणताही आदर्शवाद निग्रहाने नाकारला. त्यामुळे वास्तवात बळी तो कान पिळी असे जंगलराज आले. एक तरतूद मात्र या राज्याने घटनेत आवर्जून केली - कोणत्याही प्रकारच्या नागरी संघटना उभारण्यावर सक्त बंदी होती. ते व्यक्तिस्वातंत्र्याचे आकुंचन आहे अशी भूमिका त्यामागे होती. नागरिकाची निष्ठा फक्त राज्याशी हा आदर्शवाद होता. शासकीय आदर्शवादाची सक्ती दोघांनीही नागरिकांवर केली. त्यामुळे समाजापासून अलग राहाणे, फारसे न मिसळणे पसंत असणाऱ्या नागरिकांची पहिल्या राज्यात घुसमट होत असे तर नागरिकांच्यात नसतील तेथेही समान घटक शोधून एखादी चळवळ, एखादी संघटना उभी करू पाहाणाऱ्या नागरिकांची अशीच कुचंबणा दुसऱ्या राज्यात होत असे.

संघटनेच्या आदर्शवादाने पहिल्या राज्यातील एका डुकराची चांगलीच कोंडी केली आणि त्याला अद्दल दिली. कारण राज्यातील इतर डुकरांपेक्षा त्याची जीवनशैली वेगळी होती.

त्याने बराच काळ थांबून अखेर स्वतःसाठी स्वतःचे घर बांधले. लग्न, कायमचा पार्टनर किंवा लिव्ह-इन संबंध त्याच्या गणनेत नव्हते. माणसांच्यात असते तशी ती बूझ्र्वा प्रथा डुकरांच्यात नव्हती. त्यामुळे ते सामाजिक दडपण नव्हते. त्याचे हे वर्तन समाजाला मान्य होते पण एकटे राहाणे त्यांना खटकले. सगळ्या डुकरांनी छोट्या-छोट्या कळपांत एकत्र रहायचे, अन्नाच्या शोधात एकत्र हिंडायचे ही संस्कृती होती. याचे वागणे त्यात बसत नव्हते.

बहुसंख्य डुकरे गावभर हिंडून मिळेल ते खात, बहुधा उकिरड्यांवर, कचराकुंडीत फेकलेले शिळे, सडलेले अन्न व इतर घाण. हे जरा चवीचे डुक्कर होते. त्याला कोवळा, ताजा भाजीपाला आवडे. त्यासाठी गावाबाहेरच्या कुरणात जावे लागे आणि प्रसंगी उद्दाम डुकरांची मारहाण सहन करावी लागे. त्याला त्याची तयारी होती. तसेच ऋतूनुसार भाज्या केव्हा कोवळ्या असतील याचाही अंदाज घ्यावा लागे. त्या निबर असल्या तर तो त्यांना तोंड लावत नसे. त्यामुळे आठवडेच्या आठवडे तो उपाशी राही. पण ऋतू बदलताच परत आपल्या अन्नाच्या शोधात शेते, कुरणे धुंडाळे. हा शोधही अर्थातच बहुसंख्यांना खुपत असे. आपण याला वाळीत टाकण्याऐवजी हेच आपल्याला वाळीत टाकत आहे हे बहुसंख्यांना जाणवू लागले.

मग त्यांनी शेजारच्या शेतात, कुरणात जायला त्याला मज्जाव केला. भाजीपाल्याच्या शेताच्या हद्दीवर कुंपणे उभारली. डुक्कर त्यातूनही सरकत शेतात जाते हे लक्षात आल्यावर या कुंपणामधून विजेचा करंट सोडला. एकदोनदा शॉक बसल्यावर डुकराने कुरणाचा नाद सोडला आणि चोऱ्या सुरू केल्या. हा दखलपात्र गुन्हा झाला. आता डुक्कर बरोबर अडकले असा संघटनावाद्यांना विश्वास आला. सीसीटीव्हीवर चित्रण करून त्याला रंगेहाथ पकडण्यात आले. मग त्याचा फोन टॅप करण्यात आला, छापील पत्रव्यवहार ताब्यात घेण्यात आला. ईमेल, सोशल मीडियावरची सगळी अकाउंट्स हॅक करण्यात आली. त्याच्या कॉन्टॅक्ट्सचे चारित्र्यहनन करण्यात आले. त्याच्या YouTube, facebook. instagram, wechat, reddit, X, telegram, whatsapp, linkedin, tiktok, spotify, pinterest वगैरे पोस्ट्समध्ये फेरफार करून त्यात आक्षेपार्ह वाटेल असा मजकूर त्याच्या नावावर घुसडण्यात आला.

त्याला पकडल्याचा विजय सार्वजनिकरीत्या साजराही

झाल. अनेक डुकरांनी मोठा मोर्चा काढला, या डुकराच्या प्रतिमांवर चिखलाचे पाय नाचवले, त्याचे मोठे फोटो फाडले, पुतळे जाळले. त्याला देशद्रोही ठरवले आणि फाशीची मागणी केली. त्याच्या घराची नासधूस केली. डुकरांना न शोभेल असे त्याचे घर स्वछ आणि नीटनेटके होते. बहुसंख्यांना ते आवडत नव्हते. त्याच्यावरच्या रागाचे उट्टे त्यांनी घरावर काढले.

त्याला पोलीस कस्टडीत ठेवून खटला भरण्यात आला. त्याला वकीलही मिळेना कारण बार कौन्सिलच्या सगळ्या वकिलांनी त्याचे वकीलपत्र न घेण्याचा निर्णय एकमताने घेतला. मग आपला युक्तिवाद आपणच करू असे त्याने ठरवले. त्याला जामीनही नाकारण्यात आला.

खटला उभा राहिला. विरोधी पक्षाची धडपड खटला लांबवण्याची होती. त्यानुसार त्यांनी अनेक फाटे फोडले, अप्रस्तुत मुद्दे उभे केले, इत्यादी. डुकराने घटनेचा हवाला देऊन हा आपल्या व्यक्तिस्वातंत्र्यावर हल्ला आहे असा पवित्रा घेण्याचा प्रयत्न केला. कोर्टाने तो हास्यास्पद ठरवला. व्यक्तिस्वातंत्र्य म्हणजे कोणत्या संघटनेत सामील व्हायचे त्याचे स्वातंत्र्य असा कोर्टाने संविधानाचा अर्थ लावला.

वस्तुतः खटला हा देखावा होता. डुकराला दोषी ठरवायचे हा निर्णय झालेला होता. पण 'हे राज्य देवतांचे, हे राज्य प्रेषितांचे' असा धोरणाचा घोष असल्याने नागरिकांच्या खर्चाने खटला दीर्घकाळ चालवणे भाग होते. अर्थातच डुकराला दोषी ठरवण्यात आले. तुरुंगवास किंवा वर्तन बदलण्याची हमी असा पर्याय त्याच्यापुढे ठेवण्यात आला. वर्तन बदलणे त्याला मान्य नव्हते पण तुरुंगात जायला लागले तर वर्तन बदलावेच लागेल हेही त्याच्या लक्षात आले. म्हणजे त्याला निवडीचे खरे स्वातंत्र्य नव्हतेच. हा मुद्दा स्पष्ट करणे हा तर खटल्याचा उद्देश होता. मग त्याने वर्तन बदलण्याची हमी दिली. घर सरकारने ताब्यात घेतले आणि बाकी डुकरांबरोबर ते डुक्कर घाणीत राहू लागले, घाण खाऊ लागले. तेव्हा कोठे त्याचा सामाजिक स्वीकार झाला.

दुसऱ्या राज्यात मोठ्या प्रमाणावर डुकरांना गुलाम म्हणून वागवण्यात येई. शेतकाम, अंगमेहेनतीची कामे त्यांना अपुऱ्या आहारावर करावी लागत. तीच परिस्थिती कारखान्यातील कंत्राटी कामगारांची. एका डुकराला हे शोषण वाटे. म्हणून ते तसे वाटणाऱ्या डुकरांबरोबर चर्चा करत असे. त्यातून त्याच्या लक्षात येऊ लागले की या मंडळींची एक संघटना उभारली पाहिजे. त्यांच्या मागण्यांना वजन येईल आणि त्यांना सौदा करण्याची ताकद येईल. एकट्याने नाराजी व्यक्त करण्याने समस्येला उपाय मिळणार नाही. त्याच्या या चर्चा जमीनदार डुकरे आणि कारखानदार डुकरे यांच्या कानावर गेल्या. त्यांनी त्याला धडा शिकवण्याचे ठरवले.

प्रथम त्याला त्यांनी बोलावून घेतले. त्याच्या अंगावर चिखल उडवून त्याचे पद्धतशीर पारंपरिक स्वागत केले. त्याला मातकट डबक्यात बसवले आणि खायला दिले. मग त्याच्यासाठी एक खास गलिच्छ उकिरडा तयार करण्यात येईल, असे आश्वासन दिले. त्याला आयुष्यभर हवा तो भाजीपाला खायला देण्याचे आमिष दाखवले व माजावर आलेल्या देखण्या तरुण डुकरिणी त्याच्या सेवेला २४X७ नेमण्यात येतील असेही सांगितले. म्हणजे, अन्न किंवा मादी यांच्या शोधासाठी त्याला वणवण करावी लागणार नाही. डुक्कर जरा सावध झाले. या सगळ्यांची किंमत काय हा विचार करू लागले.

त्याचे उत्तर लगेच मिळाले. आपल्या संविधानानुसार कोणतीही संघटना उभी करण्यास बंदी आहे. ते करणे हा देशद्रोह होतो आणि तो करणाऱ्याला मृत्युदंड आहे. देशात काही डुकरे सरकारवरील असंतोषाने अज्ञ, गरीब व कष्टकरी डुकरांची संघटना बांधत असल्याचे आमच्या कानावर आले आहे. अशी डुकरे तुला माहिती असल्यास आम्हाला सांग किंवा त्यांना हा प्रयोग महागात पडेल असा आमचा निरोप दे.

एवढे सांगून त्यांनी मीटिंग संपली असे जाहीर केले. नंतर ही श्रीमंत मंडळी आपण हा पेच व्यवस्थित हाताळत आहोत असे एकमेकांना सांगू लागली. एवढी ताकीद कुठपर्यंत जाते ते पाहू व नंतर काय करायचे ते ठरवू असे त्यांनी नक्की केले.

संघटक डुकराने चळवळीतल्या काही प्रमुख डुकरांशी सल्लामसलत केली. आपण काय करावे अशी पृच्छा

केली. उत्तरे अर्थातच बरीच आली. पहिल्या डुकराच्या मते संविधान फेकून द्यावे. त्याने राजा ढाले यांच्या राष्ट्रध्वजावरील सर्वश्रुत मताचा उल्लेख केला. दुसऱ्याने आपण झुंडीने जमीनदाराच्या, कारखाना मालकाच्या घरांत घुसून त्यांना बदडावे असे मत दिले.

इतरांना इतकी टोकाची भूमिका मान्य नव्हती. हे असंवैधानिक मार्ग आहेत म्हणून गांधीवादी अहिंसक मार्ग स्वीकारवेत. गळ्याभोवती, तोंडावर काळी फीत बांधणे, लाटणी, पराती, भांडी बडवणे, धरणे, सविनय कायदेभंग, साखळी उपोषण, एकाचे आमरण उपोषण, घेराव, श्रीमंतांच्या घरांवर मोर्चे काढावेत, हे मोर्चे 'डुक्कर जमीनदार मुर्दाबाद', 'डुक्कर कारखानदार मुर्दाबाद' असे फलक दाखवतील व तशा घोषणा करतील, त्यांच्या घरांसमोर 'वैष्णवजन तो तेणे कहिए', हनुमान चालीसा अशी धार्मिक भजने जपमाळ हातात घेऊन चोवीस तास म्हणावीत. त्यांनी मालकमंडळींचे मनोपरिवर्तन करावे वगैरे सत्याग्रही मार्गांवर चर्चा झाली. या मार्गांनी मनोपारिवर्तन होते यावर श्रद्धा व्यक्त झाली. शेवटी सुप्तपणे संघटना बांधावी यावर एकमत झाले. ही चर्चा अर्थातच मालक मंडळींना त्याच वेळी कळत होती कारण ऐकण्याचे खुफिया तंत्रज्ञान.

मग हा प्रयोग गर्भावस्थेतच कसा नष्ट करता येईल यावर त्यांनी विचार केला. संसर्गजन्य रोगांचा प्रसार करणे, खाण्याच्या पदार्थांत, पाण्यात विष घालणे, विषारी भाजीपाल्याची लागवड, कॉम्प्युटरमध्ये व्हायरस सोडणे, अशा उपायांवर चर्चा झाली. पण डुकरे तर आपल्याला मजूर म्हणून सतत उपलब्ध असली पाहिजेत. त्यामुळे त्यांची मोठ्या प्रमाणावर हत्या होता कामा नये हेही त्यांच्या ध्यानात आले. ती जीवंत तर राहिली पाहिजेत पण त्यांनी संघटना उभारू नये.

एका जमीनदाराचा मुलगा मेंदूच्या विकारांचा तज्ज्ञ होता, काही औषधांनी वेगळे विचार मनात येतील असा बदल मेंदूत करता येतो असे त्याने सांगितले. हे औषध एकदाच एका इंजेक्शनने देता येईल. मात्र त्याचे साइड इफेक्ट्स अजून निश्चित नाहीत. एक साइड इफेक्ट म्हणजे त्या डुकराला वेड लागू शकेल मग त्याच्यावर नियंत्रण अवघड होईल. दुसऱ्या एकाने या डुकरांची नसबंदी करावी असे सुचवले. त्यायोगे त्यांची उद्याची पिढी जन्मालाच येणार नाही. यांच्या संभाव्य पिढीत अशा संघटक विचारांची डुकरे असू शकतील. त्यावर मूले कुठार:.

भारतात आणीबाणीदरम्यान मोठ्या प्रमाणावर सक्तीची नसबंदी करण्यात आली होती हे त्याने समर्थनार्थ नमूद केले. आपल्याला आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण करण्याची जरूरी नाही. आपली सद्य व्यवस्थाच तिथल्या त्या वेळच्या आणीबाणीसारखी आहे असे नेतृत्वाने नमूद केले.

आणखी एकाने असे सुचवले की नेतृत्वावर खटले भरून त्यांना काही वर्षांसाठी तुरुंगात टाकावे. त्यांचा जनसंपर्क बाद झाला की आताचा उपद्रव तरी कमी होईल. भारतात अर्बन नक्षलवादी म्हणून ओळखली जाणारी मंडळी, पाकिस्तानात माजी पंतप्रधान यांच्यावर अशा कारवाईने सत्ताधीशांचा फायदा झाला.

एक जमीनदार जरा बुद्धिवादी होता. त्यामुळे त्याला कोणी गांभीर्याने घेत नसे. डुकरे मुळात आपल्या विरोधात का उभी राहत आहेत हा प्रश्न आपण आपल्याला विचारला पाहिजे असे त्याने म्हटले. त्यांचा आहार कमी आणि अंगमेहनत जास्त असे जर त्यांना वाटत असेल तर आपण त्यांचा आहार सुधारू शकतो, कामाचे तास निश्चित व कमी करू शकतो. त्यायोगे बहुसंख्यांचा कल संघटनेकडे वळणार नाही. कारण संघटना बांधून ती याच मागण्या करणार. आपण त्या आधीच अंमलात आणाव्यात. एक जमीनदार सरकारचा अर्थसल्लागार होता. त्याने अशा योजनेने आपल्या आर्थिक उत्पन्नात इतकी घट येईल की शेती काय किंवा कारखानदारी काय काहीच करणे परवडणार नाही, असे आकडेवारीने सिद्ध केले. बुद्धिवादी मग गप्प बसला, त्याने परत तोंड उघडलेच नाही.

आणखी एक जमीनदार विज्ञानाचा भोक्ता होता. त्याच्या मते, आपल्या वैद्यकीय उपचारांनी - मेंदूत ढवळाढवळ किंवा संसर्गजन्य रोग होतील अशी लस किंवा नसबंदी याने या मजूर डुकरांच्या संख्येत जी घट होईल, ती भरण्यासाठी आपण डुकरांचे क्लोन्स बनवावेत. क्लोन्सचा फायदा असा की ते आदर्शवादमुक्त असतात,

त्याने स्कॉटलंडमधील डॉली नावाच्या जगातल्या पहिल्या क्लोनचे उदाहरण दिले, तसेच अर्जेंटिनाच्या आताच्या अध्यक्षाचा आवडता पाळीव कुत्रा मेल्यावर त्याने त्या कुत्र्याचे क्लोन्स करून घेतले आणि आता ते त्याचे पाळीव कुत्रे आहेत असे उदाहरणही दिले.

सगळ्यांनाच ही सूचना आवडली. मुळात त्यांना आज्ञाधारक मजूर हवे होते. त्यांना डुकरांचे असे खास प्रेम नव्हते. क्लोन्सच्या निर्मितीचा खर्च शोधण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली. जर हा खर्च परवडण्यासारखा असला तर भविष्यातील शेती आणि काखानदारी आमूलाग्र बदलू शकेल हेही त्यांच्या लक्षात आले. त्याचबरोबर रोबो हे काम करू शकतील का याचा तपास घेण्याचेही ठरवण्यात आले. रोबोला खायला लागत नाही. तो बॅटरीवर चालतो हाही फायदा होता.

शेवटी असा निष्कर्ष काढण्यात आला की सर्व मार्ग हाताळावेत. प्रथम संघटक डुकरांना अटक करून विचार बदलणारी औषधे द्यावीत. विचार बदलत आहेत, म्हणजे संघटनेचा विचार त्यांच्या मनातून गेला हे दिसल्यावर तीच औषधे कार्यकर्त्यांना द्यावीत व त्यांची नसबंदी करून त्यांना संसर्गजन्य रोग लावावेत. त्यांच्या वस्त्यातील अन्न, पाणी दूषित करावे. यात जे दगावतील त्यांची जागा घ्यायला अनेक डुकरे आपल्याला उपलब्ध आहेत. त्याच वेळी क्लोन्स आणि रोबो यांचे उत्पादन सुरू करावे. जर काही औषधांनी काही डुकरे कायमची रुग्ण झाली किंवा वेडी झाली तर त्यांना शेजारच्या वराहनगरीत हाकलून द्यावे. ते राज्यही या आगंतुकांमुळे जरा दुबळे होईल. ते आपल्याला एरवीही हवेच आहे.

थोडक्यात, मजुरांची संघटना होणे ज्यांना अमान्य होते, त्या श्रीमंतांनी स्वतःची संघटना करून तंत्रज्ञानाच्या मदतीने मजुरांना नामोहरम करण्याचा आराखडा तयार केला.



हंस

कुबेराच्या अलकापुरीत मोठा सोहळा होता. हंस विशेष निमंत्रित होते. सोहळा तर कुबेराला शोभेल अशा दिमाखात पार पडला. मात्र एक नाठाळ हंस कुबेराच्या आवडत्या यक्षाशी विनाकारण जरा उद्धटपणे वागला. शिवाय दिसेल त्याच्याशी वादावादी, काहीतरी विवाद्य विषय उकरणे, कुरापती काढणे इत्यादी. त्याचा आवाजही मोठा आणि कर्कश्श होता. सगळ्या समारंभाचा विचका होऊ शकला असता. त्या आधी कुबेराने सुरक्षा कर्मचाऱ्यांना इशारा करून त्याला मेजवानीतून बाहेर काढला. सोहळा संपला आणि आता हंसांचा थवा अंतरिक्षातून आकाशात येत होता. हंस आपल्या स्वर्णनगरीकडे परतत होते. ती नगरी अंतरिक्ष आणि आकाशाच्या सीमेवर होती. देवाने ती तेथे वसवली. त्यामुळे हंस पृथ्वीवरही लक्ष ठेवू शकत आणि हवे तेव्हा अंतरिक्षातही संचार करू शकत. संपूर्ण आकाश इंद्रधनुष्याच्या रंगांत होते. त्यामुळे हंसांचा संचार अधिकच सुखद झाला.

खूप खालून पृथ्वीवर एक प्रेमिक गाणे गात होता, ते त्यांना ऐकू येऊ लागले - 'बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरात, भेट आपुली स्मरशि काय तू मनात' आपण इतक्या अंतरावरून कदाचित बगळे दिसत असू

या विचाराने काही हंसांची करमणूक झाली. काहींना ही मानवी विनोदबुद्धी वाटली. काहींना हे मानवी कोत्या कल्पनाशक्तीचे उदाहरण वाटले तर इतर काहींना सुंदर गोष्टी न कळण्याची ही मानवी वृत्ती वाटली. त्याही पुढे जाऊन काहींना माणसे अद्‌भुत सौंदर्याचे कसे अवमूल्यन करतात याची ही प्रचिती वाटली. त्यांना अशा गोष्टी मलिन करायला आवडतात कारण ती स्वतः मलिन असतात. हंसांचा मुक्त विहार आणि प्रेयसीची आठवण एकाच काव्यात गुंफणे आणि ते गाणे हे फक्त मानवांनाच शक्य असावे! कोठे हंस आणि कोठे ते स्मृतिशेष नाते! तेही 'तो तिला भेटला' एवढेच! एका संस्कृत वचनानुसार सोने म्हणते - 'अग्नीवर तापवा, ठोका, पिळा पण गुंजेबरोबर मला तोलू नका'. याची त्यांना आठवण झाली.

वस्तुतः पूर्वापारपासून माणसांनी हंसांवर कथा रचलेल्या आहेत. अनेक देशांच्या दंतकथांमध्ये हंसांचा उल्लेख प्राधान्याने आहे. काहींत तर हंस नायक आहेत. हंस ही भौतिक जगापासून सुटका मानलेली आहे. हंसध्वनि नावाची अभिजात संगीतरचनाही आहे. हंसांचे चित्रण हा कलाकारांचा आवडता विषय राहिलेला आहे. एका धर्मश्रद्धेनुसार हंस हे मर्त्य व अमर्त्य दोन्ही जगांत संचार करू शकतात - जसे आपले हंस करत होते. ही श्रद्धा हंस पवित्र आणि शुद्ध मानते. एका कवीने राजहंसाचे चालणे डौलदार असते पण म्हणून आम्ही चालूच नये काय अशी पृच्छा केली होती.

बहुतेक पाश्चात्य दंतकथांत हंसांचा मनोज्ञ उल्लेख आहे. बहुधा हंस पिसाऱ्यामागे स्त्रिया असतात. हवे तेव्हा पिसारा पांघरून स्त्रिया होतात व स्वर्गाला जातात. या कथांत बहुधा एखादा राजपुत्र सुंदर स्त्रीच्या प्रेमात पडतो आणि तिचा हंसाचा पिसारा लपवतो. त्यामुळे ती त्याला सोडून जाऊ शकत नाही. काही दंतकथा असे सांगतात की तिने जाऊ नये म्हणून राजपुत्राची आईच तिचा वेष लपवते. लपवलेला हंसाचा वेष आणि तो मिळाल्यावर हंस निघून जाणे हा या गोष्टींतील समान धागा दिसतो.

अशा एका दंतकथेनुसार काही हंस स्त्रीरूपात नदीत स्नान करत असतात. त्यांनी त्यांचे कपडे म्हणजे पिसारे काठावर ठेवलेले असतात. एक राजपुत्र तेथून जात असतो आणि तो हे पिसारे लपवतो. त्या स्त्रियांतील सर्वांत सुंदर स्त्रीला तो लग्नाची मागणी घालतो व पिसारा परत देण्याचे आश्वासन देतो. ती होकार देते आणि त्याच्याशी लग्न करते. काही काळ दोघे जण राजपुत्राच्या राजवाड्यात रहातात. एक दिवस ती आपला पिसारा पांघरून स्वर्गाला रवाना होते. राजपुत्र तिला शोधण्यासाठी अनेक कष्टकर प्रवास करतो व स्वर्गाला जातो, तिला भेटतो. पण काही काळाने तो एकटाच पृथ्वीवर परततो.

पण माणसांना अल्पस्मृतीचा शापही असतो. त्यामुळे त्यांना हे आकाशमार्गी हंस बगळे वाटतात.

परत आकाशमार्गावर असणाऱ्या आपल्या हंसांकडे वळता, ते आकाशात विहार करत असताना समारंभात उर्मटपणे वागणारा हंस अचानक उडेनासा झाला. तो बेशुद्ध झाला. त्याच्या पंखांमधील ताकदच गेली होती. गरगरत तो वेगाने पृथ्वीवर पडला. त्याला मदत म्हणून, काय झाले ते कळावे म्हणून निम्मा थवाही जमिनीवर उतरला. सुदैवाने हंस जंगलात लांडग्यांच्या वस्तीत पडला, माणसांच्या नाही. आजूबाजूचे लांडगे तातडीने धावून आले. माणसांच्या वस्तीत पडला असता तर माणसेही धावून आली असती कदाचित, पण त्यांचे हेतू हंसाला श्रेयस्कर नसण्याची शक्यता जास्त होती.

हंसाला बेशुद्ध पाहून लांडग्यांनी मोठा आवाज करून त्यांच्या भाषेत वैद्य लांडग्याला बोलावले. तो एक ससा खात होता, ते मिष्ट मांस सोडून तोही पळत आला. प्रथम त्याने हंसाचा श्वासोच्छ्वास चालू आहे का हे तपासले. गवताचे एक पाते त्याच्या नाकावर धरले, ते हलले. मग एक डोळा उघडून पहिला. तो जिवंत आहे याची खात्री करून घेतली. मग तो उपचाराला लागला. प्रथम त्याने नाकातोंडात नळ्या खुपसून काही द्रव्ये भरली. हे काम जरा कठीण व कौशल्याचे होते; कारण हंसांचे नाक [आणि कान] त्यांच्या चोचीखाली दडलेले असतात.

हंसाने काय खाल्ले होते असे त्याने विचारले. हंसाच्या मित्रांनी कुबेराकडे मेजवानी होती व त्यातील पदार्थांनी विकार होणे असंभव आहे असे सांगितले. अन्नात जस्त किंवा शिसे नव्हते, अन्नातून विषबाधा नव्हती. तेथली हवाही शुद्ध होती म्हणजे धुरानेही त्रास होण्याची शक्यता

नव्हती. काही पक्ष्यांना अनेक रंगांचे आकाशही सहन होत नाही. आताचे आकाश तर चांगलेच रंगीत होते. त्यामुळेही हंसाला घेरी आली असावी असे लांडग्याला वाटले. पण हे निरीक्षण त्याने बाजूला ठेवले. प्रथम प्रथेनुसार तपासणी करू असे ठरवले.

हा वैद्य अनेक प्रकारच्या वैद्यकशास्त्रांत प्रवीण होता. एका शास्त्रानुसार त्याने रक्त, रक्तदाब, थुंकी, नाडी, हृदयाचे ठोके या तपासण्या प्रथम केल्या. त्यात काही अनिष्ट दिसेना. मग हंसाच्या लपलेल्या गुडघ्यावर लाकडी हातोडा मारून पाय उडतो का हे पहिले. पाय उडाला , मग एक्स-रे काढला. तो स्वच्छ होता. मग अनुक्रमे सोनोग्राफी, एमआरआय, अल्ट्रासाऊंड स्कॅन, मेंदूचा स्कॅन, संपूर्ण शरीराचा सीटी स्कॅन, कोलोनोस्कोपी व इतर अनेक चाचण्या केल्या. तरीही काय नक्की झाले आहे याचा पत्ता लागेना. या वैद्यक शास्त्रानुसार हंसाला ॲव्हिअन फ्लू, अव्हिअन पॉक्स, बॅक्टेरिअल इन्फेक्शन, फंगल इन्फेक्शन यातील काहीही झाले असण्याची शक्यता होती. तसेच कोणत्यातरी परजीवी जंतूमुळेही ही व्याधी झाली असावी. निश्चित रोग कळण्यासाठी आणखी तपासण्या आवश्यक होत्या. प्रत्येक रोगावर अर्थातच प्रत्येकी किमान दहा तरी औषधे होती.

प्रत्येक औषधाचे प्रत्येकी किमान वीस तरी साइड इफेक्ट्स होते. डोकेदुखी, पित्त वाढणे, मळमळणे, अन्न घशाशी येणे, पोट बिघडणे, अतिसार, मलावरोध, पोटातून कळा येणे, घसा सुजणे, चेहरा सुजणे, सांधे सुजणे, दमणूक, ग्लानी येणे, अन्न गिळायला त्रास, श्वसनाला त्रास, त्वचेवर रॅश, त्वचेखाली गाठी, झोप उडणे, चक्कर येणे, छातीत धडधड होणे, तोंड कोरडे पडणे, अंधूक दिसणे, ऐकू कमी येणे, पिसे गळणे, विचित्र स्वप्ने पडणे, भास होणे, संभ्रम, एकाग्रता जाणे, मानसिक असंतुलन, डोक्यातून आवाज ऐकू येणे, वारंवार विस्मरण होणे इत्यादी. इंग्लंडच्या राजाला तर अलीकडे मूळ विकार [कॅन्सर] दूरच पण अशा साइड इफेक्ट्समुळे इस्पितळात दाखल करावे लागले होते.

म्हणून आणखी तपासण्या करण्याआधी व औषधे देण्याआधी इतर वैद्यकीय मार्गांचा अवलंब करावा असे लांडग्याचे मत पडले. त्याला बाकीच्या हंसांनी मान्यता दिली.

मग दुसऱ्या वैद्यकशास्त्रानुसार त्याने शतगंधा, कामदुघा, ब्राह्मीप्राश, गुडूच्यादि घन वटी, त्रिफळा यांचे चूर्ण केले. ते आल्याच्या रसात आणि जवसाच्या तेलात मिसळून मिश्रण केले, ते हंसाला पाजले. त्याच्या डोक्यावर काही पिंपळाची पाने लावली. काही लेप लावले. अंगाऱ्यांवर ओवा आणि जिरे जाळून ती धुरी दिली. एका औषधी अर्काचे थेंब हंसाच्या कानात घातले. हंसांचे कान चोचीखाली असल्याने हेही काम अवघड होते.

त्यानेही हंस शुद्धीवर येईना.

मग लांडग्याने चिनी उपचार करून पाहिले. पेंग्विन पक्ष्यांचे दुखणे ॲक्युपंक्चरने दूर करण्यात आले होते. तो प्रयोग आणि ॲक्युप्रेशर त्याने हंसावर करून पाहिले. त्यासाठी हंसाच्या मानेवरील, त्याच्या विचित्र पायांवरील विशिष्ट बिंदूंवर दबाव देणे, विशिष्ट बिंदूत सुई घुसवणे असे अनेक प्रयोग केले.

वैद्याला इतर उपचारपद्धतीही माहिती होत्या. त्यातील एकीने परिणाम व्हायला काही महिने जात असत. पण त्या करण्याची जरूरी पडली नाही कारण केल्या त्या सगळ्या किंवा त्यातील कोणत्यातरी उपचारांनंतर एकदाचा हंस व्यवस्थित जागा झाला. मानवी वस्तीत अशी वैद्यकीय विविधता एका ठिकाणी उपलब्ध झाली नसती आणि तो भानावर येण्याचीही खात्री नसती. बेशुद्ध हंसाला घेऊन त्याच्या मित्रांना दारोदारी याचक म्हणून फिरावे मात्र लागले असते.

हंस जागा तर झाला. प्रथेनुसार अशा अल्पविस्मृतीनंतर 'मी कोठे आहे' असे विचारूही लागला. मित्रांनी जे झाले ते सांगितले. त्याला कुबेराकडचा समारंभ व त्यानंतरचे उड्डाण आठवत होते, नंतर काही नाही.

पण त्याच्या पंखातील ताकद गेलीच होती. ती फिजिओथेरपीच्या काही व्यायामांनी पूर्ववत होईल किंवा होणारही नाही असे लांडग्याचे मत पडले. आणखी एक उपाय त्याने सुचवला. तो म्हणजे, हंसाने पोहण्याचा प्रयत्न करावा व रोज नियमित काही वेळ पोहावे.

हा हंस आता उडू शकणार नाही हे लक्षात आल्यावर

तेथे राहाणे इतर हंसांना आवश्यक नव्हते. वियोगाचे अवडंबर न करता त्यांनी त्या हंसाचा निरोप घेतला आणि ते आकाशमार्गी लागले.

लांडग्याने हंसाला सांगितले की जवळ एक तळे आहे. तेथे तो पोहू शकेल. त्या तळ्यात बदके डुंबत असत. हंसाला त्याच्या लहानपणाची आठवण झाली. तो लहान पिल्लू असताना बदकांबरोबर राहात असे. त्याची कुचेष्टा होत असे, त्याच्या दिसण्यावर इतर बदके हिणकस बोलत. त्यामुळे तो अतिशय दुःखी असे. पण एके दिवशी त्याने स्वतःचे प्रतिबिंब पाण्यात पहिले आणि त्याच्या लक्षात आले की तो एक राजहंस आहे.

आता हा क्रम उलटा झाला आणि हंस परत पूर्वपदाला गेला..

वस्तुतः समारंभातील त्याच्या गैरवर्तनामुळे रागावलेल्या कुबेराने त्याला शाप दिला होता आणि हे अपंगत्व आले होते. देवाच्या न्यायानुसार अपराधाला शिक्षा असतेच पण आपल्याला शिक्षा का झाली हे अपराध्याला कधीच समजत नाही.



विंचू

जंगल मोठे होते. प्राण्यांनी त्यांचे त्यांचे राहाण्याचे प्रदेश ठरवलेले होते. ससे, खारी, सरडे एकत्र एका प्रदेशात राहात. साप, अजगर, खेकडे, विंचू निराळ्या प्रदेशात. चित्ते, वाघ, सिंह आणखी निराळ्या प्रदेशात, इत्यादी.

प्रश्न फक्त तेव्हा यायचा जेव्हा एखादा प्राणी चुकून दुसऱ्या प्राण्यांच्या इलाक्यात जायचा. उदाहरणार्थ, चित्ता सशांच्या प्रदेशात गेला तर सशांची धावपळ व्हायची. माकडे कुत्र्या-लांडग्यांच्या प्रदेशात आली तर कुत्री भुंकून भुंकून त्यांना पळवून लावायची. पण चतुर माकडे झाडांवर चढून बसली की ती कुत्र्यांचा दम संपेपर्यंत झाडांवरच राहायची. असे क्वचित प्रसंग सोडता अगदी शांततापूर्ण सहजीवन नाही पण जंगल बऱ्यापैकी खुशाल असे.

देवाने जंगल तयार करताना काही वेली लावल्या होत्या. या वेली जमिनीवर पसरत असत व झाडांना वेटोळे घालत वर चढतही असत. जवळ आलेला प्राणी त्या त्यांच्या खोडांनी किंवा फांद्यांनी पकडत असत. त्या प्राण्याभोवती वेटोळी गुंडाळून त्याला गुदमरून टाकत. अखेर श्वास न घेता आल्याने प्राणी मरे. मग त्याचा या वेलीला काहीच उपयोग नसे. प्राण्याला गुदमरवणे एवढेच वेलीचे जीवितकार्य असे. तो मृत प्राणी त्या फेकून देत. ते जमिनीवर पडत. काही वनस्पती कीटकांना आकर्षित करतात आणि कीटक फुलात आला की पाकळ्या बंद करतात किंवा काही द्रवाचा स्राव करून त्यांना पकडतात व खातात. त्या क्रियेची ही आवृत्ती.

मांसाहारी जनावरांसाठी देवाने ही सोय केली होती. म्हणजे त्यांना त्यांचा प्रदेश सोडून इतरांच्या प्रदेशात शिकारीला जायला लागू नये. तसेच ताजा मांसाहार आयता मिळाल्याने त्यांचा शिकारीचा हिंसकपणाही कमी होत गेला.

जमिनीवरून जाणारे ससे, झाडावर चढणाऱ्या खारी, कांगारू, झाडांवर राहणारे किंवा येऊन बसणारे पक्षी, माकडे यांच्यावर या वेली हल्ला करत. काही काळाने हे वेल कोठे आहेत ते प्राण्यांच्या व पक्ष्यांच्या लक्षात येत असे आणि ते ती झाडे टाळत असत. मग देव या वेली अदृश्य करत असे व वेगळीकडे नव्या झाडांवर चढवत असे. हा उपक्रम सतत चाले.

एकूण जंगलाची घडी बसली होती असे म्हणता यावे.

पण विंचू जरा अस्वस्थ होते. त्यांना आपण फार मागासलेले आहोत असे जाणवत असे. आपण जंगली विंचू म्हणून जन्माला आलो पण जंगली विंचू म्हणून मरायचे नाही असा त्यांचा विचार होता, म्हणून काही निवडक

विंचवांना नेतृत्वाने परदेशी पाठवले. अपेक्षा ही की तेथून नवीन काही मूल्ये शिकून हे विंचू आपल्याला प्रगतीपथावर नेतील. जेथे त्यांना पाठवले ते जंगल सुधारलेले मानले जाई. निवड झालेले विंचू आनंदले. त्यांना हे माहिती नव्हते की निवड चिठ्ठ्या टाकून केली होती. हजाराहून अधिक इच्छुकांतून कोणीही पन्नास निवडले गेले असते. पण स्वाभाविकपणे ज्यांची निवड झाली त्यांना ही निवड आपल्या गुणवत्तेवर झाली असे वाटू लागले.


निवडक विंचू परदेशी गेले. तेथे गेल्या गेल्या त्यांना आपण फारच उणे आहोत असे वाटू लागले. एकतर तेथील विंचू निराळ्या प्रकारे राहात असत, ते चांगल्या बांधलेल्या बिळांमध्ये राहात असत. जंगली विंचवांसारखे कोणत्याही खबदाडीत, कानाकोपऱ्यात रहात नसत. ते वेगळे अन्न खात. जंगली विंचू मिळतील ते किडे, कोळी, पाली आणि अगदी इतर विंचूही खात. आपल्या नांगीचा ते यासाठी उपयोग करत आणि डंख करून सावजात विष भिनवत. त्याला बेशुद्ध करत व ठार मारत. परदेशी विंचवांना दुसरे विंचू खायची परवानगी नव्हती. स्थानिक किडे, कोळी, पाली कमी पडले तर ते आयात केले जात.

परदेशी विंचू या नव्याने आलेल्यांच्यात मिसळत नसत. यांना तुच्छतेने वागवले जाई. अगदी बहिष्कृत नाही; पण जेमतेम कामापुरती देवाणघेवाण. आपल्या देशाला परतायची ओढ अनेक विंचवांना लागली. पण काही काळ परदेशी काढू असा करार त्यांना पाठवण्याआधी करून घेण्यात आला होता. तसेच अर्धवट मुक्कामाने त्यांना नामुष्कीही आली असती. त्यातील काही मोजक्या विंचवांना नवीन देश आवडलाही.

काही अगदी थोड्या विंचवांच्या लक्षात आले की या प्रदेशाची व्यवस्था निराळी आहे. आपल्याकडे जसा राहाण्याचा, वावरण्याचा मोकळेपणा असतो, तो इथे नाही. सगळे दबून वागत असतात. सतत आपल्यावर अदृश्य गस्त असते असे पाहुण्या विंचवांना जाणवत असे. त्याचे कारण म्हणजे तेथील अर्ध्याहून जास्त विंचू काही मूठभर विंचवांना प्रमुख म्हणून निवडतात. ते मूठभर विंचू सगळ्यांसाठी नियम करतात. कोणी काय करायचे हे नियम ही मंडळी करतात आणि बाकीचे बहुसंख्य ते नियम इमानेइतबारे पाळतात. नियम करणारे विंचू कधीच बाहेर दिसत नाहीत. अर्थात काही विंचू नियम झुगारण्याचा प्रयत्न करतातही पण इतर विंचू दंश करून त्यांना ठार मारतात. त्यामुळे या प्रदेशात अंतर्गत हिंसा मोठ्या प्रमाणात होत नाही. नियमबाह्य वर्तनावर कडी नजर ठेवणारे इतरांसारखेच विंचू त्यांच्यात मिसळून असतात. ही अदृश्य गस्त. सैन्यात भरती करायला जे विंचू निवडले जातात फक्त त्यांना इतर विंचवांना डंख करायची परवानगी असते. ते सैन्य वेगळ्या प्रदेश जिंकण्यासाठी पाठवले जाते. तेथे ते शत्रूला गुलाम करून मायदेशी नेतात किंवा डंखाने ठार मारतात. म्हणजे, विंचवांची हिंसा फक्त परकीय प्रांतात होते. आजवर आपल्यावर हल्ले का झाले नाहीत याचे उत्तर विंचवांना मिळाले. या प्रदेशातील विंचवांना आपण कितीही नावडते असलो, तरी त्यांच्या नियमांनुसार त्यांना प्रदेशांतर्गत हिंसा करता येत नाही.

आता प्रश्न असा होता की ही व्यवस्था आपल्या जंगलात आणावी का? ती आणण्याचे व्यावहारिक घटक जरी बाजूला ठेवले तरी, तत्त्वतः ही व्यवस्था तेथे आणणे विंचवांना श्रेयस्कर वाटले नाही. आपण जंगली विंचू म्हणूनच जगू आणि मरू.

'प्रगत' प्रदेशाने भ्रमनिरास केल्यावर विंचू मायदेशी परतले.



घुबडे

विंचवांचा हा उपक्रम पाहून घुबडांनीही जंगल सोडायचे ठरवले. नेतृत्वाने त्यांना प्रोत्साहन दिले. हजार-

एक घुबडे जंगल सोडायला इच्छुक होती. चिठ्ठ्या टाकून पन्नासांची निवड झाली. त्यांना एका निराळ्या जंगलात पाठवण्यात आले.

घुबडे जेथे गेली तेथील आगमनालाच त्यांना एक मोठ्या ढोलीत नेण्यात आले. एकेकट्या घुबडाची पंधरा ते वीस घुबडांनी कसून चौकशी केली ती प्रत्येकी सुमारे तीन तास चालली. त्यांचा, पत्ता, वय, शिक्षण, उंची, वजन, उघडले नसताना पंखांची लांबी, उघडल्यावर विस्ताराची लांबी - सेंटीमीटर्समध्ये, किती अंतर एका उड्डाणात जाऊ शकतो, किती उंचीवरून उडू शकतो - मीटर्समध्ये, कोणत्या हवामानात उडू शकतो आणि कोणत्या नाही [किती डिग्री किमान आणि कमाल तापमानात आणि हवेच्या आर्द्रतेत], भक्ष्यसंचय किती दिवसांसाठी/आठवड्यांसाठी/महिन्यांसाठी करतो, कोठे करतो, आवडते व नावडते भक्ष्य कोणते; बेडूक, सरडे, साप, मासे, उंदीर, पक्षी, खारी खातो का, इतर काय काय खातो - त्यात किडेही खातो का; भक्ष्य पकडण्याआधी त्याच्यावर आकाशात फेऱ्या मारतो का, का एका जागी बसून राहातो आणि भक्ष्य नजरेत आल्यावर त्याच्यावर झेपावतो, का भक्ष्य दिसल्यावर त्याच्यामागे पळत जाऊन त्याला पकडतो, वगैरे. हे प्रश्न झाल्यावर कुटुंबाची चौकशी करण्यात आली. माहिती असलेच तर किंवा होते तेव्हा आई-वडील, त्यांचा आदर्शवाद, त्यांच्या श्रद्धा, त्यांची दैवते, ते एखाद्या संघटनेचे सभासद होते का, वगैरे. जंगलातून आलेल्या घुबडांना बहुतेक प्रश्न कळलेच नाहीत. दिवसा किंवा रात्रभर भक्ष्य शोधायचे आणि आराम करायचा या त्यांच्या दिनक्रमात कसला आदर्शवाद आणि कसली श्रद्धा! त्यांना हसूच यायला लागले पण प्रश्नकर्ते गंभीर होते आणि त्यांनी प्रत्येक प्रश्नाचे उत्तर प्रामाणिकपणे दिले पाहिजेच हे स्पष्ट केले. ज्या शारीरिक प्रश्नांची उत्तरे घुबडांना देता आली नाहीत, त्यासाठी त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. म्हणजे, परदेशी घुबडांनी मोजमापे घेतली. त्याबरोबर रक्तदाब, हृदयाचे ठोके वगैरे प्राथमिक तपासण्याही केल्या.


या सगळ्या सोपस्कारांनंतर कोठे घुबडांना त्यांचे राहायचे ठिकाण दाखवण्यात आले आणि त्या ढोल्यांची रचना समजावून सांगण्यात आली. घुबडांना बरे वाटले कारण एरवीही स्वतःचे निवासस्थान स्वतः बांधण्याचे कौशल्य त्यांना नव्हते. ती नैसर्गिकरीत्या झाडात झालेल्या ढोलीत किंवा इतर पक्ष्यांच्या घरट्यात किंवा सुतार पक्ष्याने केलेल्या ढोलीत राहात असत. मग त्यांचा दिनक्रम त्यांना सांगण्यात आला. त्यांना दिवसातून १८ तास काम करावे लागेल. घुबडे घाबरली. त्यांना त्यांच्या जंगलात काम म्हणजे काय हेच माहिती नव्हते. इथे तर दिवसभर - तेही अठरा तास - काम करावे लागणार. काम काय असेल? जवळच्या काही हजार एकर्स शेतजमिनीवर उंदीर व तत्सम प्राण्यांची संख्या फार वाढलेली आहे. त्यामुळे शेतावर अनिष्ट परिणाम होत आहे. घुबडांनी या प्राण्यांना मारावे. हवे तेवढे खावेत व इतर मेलेले प्राणी एका विशिष्ट ठिकाणी टाकावेत म्हणजे जंगलाचे अधिकारी त्यांचे काय करायचे यांचा निर्णय घेतील. घुबडांनी आपली घरटी आपण बांधणे शिकावे. त्याचे प्रशिक्षण जंगल देईल. घुबडांनी प्रजनन वाढवावे. या प्रदेशाला आणखी घुबडांची जरूरी आहे.

अशा सविस्तर प्रस्तावनेनंतर घुबडांना त्या दिवसासाठी मोकळीक देण्यात आली. दुसऱ्या दिवशी पहाटे चार वाजल्यापासून काम सुरू होईल असे सांगण्यात आले.

घुबडांनी जेमतेम चारपाच दिवस या दिनक्रमात काढले. पहिली गोष्ट म्हणजे ते या दीर्घ दिवसाने पार थकून जात. दुसरे म्हणजे त्यांनी त्यांच्यापरीने कितीही उंदीर मारले तरी अधिकाऱ्यांना आणखी काही पटीत उंदीर मारणे अपेक्षित असे, ते ती नापसंती दर्शवत. तिसरे म्हणजे घरटी बांधणे कितीही प्रयत्न केला तरी त्यांना जमेना. म्हणजे ती नाराजीही आली. त्यात नराला सहमत मादी किंवा मादीला सहमत नरच मिळेनात. म्हणजे पुनरुत्पादनही पुढे सरकेना. त्यांचे वास्तव्य काही सुखकर होईना. काय अवदसा आठवली आणि आपण हे खूळ काढले असे त्यांना वाटू लागले,

त्यांनी एकत्रपणे अधिकाऱ्यांना सांगण्याचे ठरवले की आम्हांला परत पाठवा. तसे सांगितलेही. अधिकाऱ्यांनी शांतपणे त्यांच्या निदर्शनाला आणले की त्यांच्या जंगलाशी असा कोणताही करार नाही ज्या योगे ते हवे तेव्हा परत जाऊ शकतील.

दुसऱ्या शब्दांत घुबडे आमरण तेथे वेठबिगार झाली. हा या जंगलाचा पूर्वनियोजित कट असावा असा संशय त्यांना आला पण इलाज नव्हता.



झुरळ

विंचू आणि घुबडांसारखीच झुरळांना दुसऱ्या ठिकाणी जायची इच्छा झाली.

झुरळे बऱ्याच प्रकारची होती. सगळ्या झुरळांना अंधार आवडे. ती प्रकाश टाळत. अन्नाचा शोध हा त्यांचा एकमेव कार्यक्रम असे.

रंग आणि आकार यानुसार त्यांच्यात फरक असले तरी हे दोन गुणधर्म कायम होते. काही झुरळे सोनेरी, काही हिरवी, काही पिवळी, काही निळी आणि एक पाचवा गट अवर्णीय - तो अभ्रकासारखा पारदर्शक रंगाचा होता. हा गट कायमच चारी गटांबाहेर असे व त्यांना तशी वागणूक दिली जाई. गटांतर्गत काही झुरळे आकाराने लहान तर काही मोठी. त्यातही रंगांच्या अनेक छटा होत्या, दाट हिरव्यापासून पोपटी हिरव्यापर्यंत, दाट निळ्यापासून सौम्य निळ्यापर्यंत, वगैरे.

सोनेरी झुरळे ७०-८० अगदी १०० मीटर्सपर्यंत उडू शकत, हिरवी झुरळे १० मीटर्सपर्यंत. इतर झुरळे पंख असले तरी उडू शकत नसत. ती भक्ष्य मिळवण्यासाठी सरपटत जात. त्यामुळे त्यांच्या खाद्य निवडण्यावर बंधने येत. स्वाभाविकपणे सोनेरी झुरळे वर्णउतरंडीत सगळ्यात वरच्या स्थानावर समजली जात. मग हिरवी, मग पिवळी वगैरे. म्हणजे, मोठी सोनेरी रंगांची झुरळे इतरांना तुच्छ मानत पण तरीही विशिष्ट रंगाच्या झुरळांचा प्रत्येक गट इतर सर्वांना निम्न माने. चारही गट अवर्ण गटाला तुच्छ मानत. एका रंगाच्या झुरळांमध्येही रंगच्छटेनुसार अंतर्गत भेद असत पण ते दोन भिन्न रंगांच्या गटांच्या भेदाच्या तुलनेत मवाळ असत.

एका प्रकारच्या झुरळांना दुसऱ्या प्रकारच्या झुरळांचे आहार वर्ज्य असत. त्यांचे आचारविचार भिन्न असत. त्यांच्या प्रथा-परंपरा निराळ्या असत. ही सांस्कृतिक शिकवण बाळपणीच मनावर बिंबवली जात असे. ती आयुष्यभर कायम राहात असे. मुख्यतः हे भेद आहार आणि शरीरसंबंध याबाबत असत. झुरळे सामान्यतः खाण्याबाबत फारशी निवडक नसतात. कोणत्याही एकेकाळी जिवंत असणाऱ्या वनस्पती आणि प्राणी यांचे उरलेले, शिळे किंवा सडलेले कण ती आनंदाने खातात. तरीही रंगांनुसार त्यांच्या चवी निराळ्या असतात. उदाहरणार्थ, हिरवी झुरळे जास्तकरून भाजीपाल्याचे उरलेले कण खात, पिवळी झुरळे जास्तकरून चिकट पदार्थ खात, निळी झुरळे जास्तकरून मांस खात, इत्यादी.

वेगळ्या रंगाच्या किंवा रंगछटाच्या झुरळाशी संबंध निषिद्ध असत. या वातावरणात नेमके एक सोनेरी मोठे मादी झुरळ एका छोट्या दाट लाल नर झुरळाकडे आकर्षित झाले. तोही तिच्या प्रेमात पडला. प्रथम दोघे एकमेकांसाठी अन्नाचे पळवलेले कण, कागद, डिंक आणू लागले तर नर विशेषतः गोड खाद्य आणून देऊ लागला, मग एकमेकांभोवती रुंजीही वाढली. ते एकमेकांचा वास घेऊ लागले. नर पंख फुलवून मादीला आकर्षित करू लागला. तिच्या पाठीवर गोड चिकट पदार्थ ठेवू लागला. झुरळी परंपरेनुसार हे कृत्य साखरपुडा झाला असे जाहीर करणे होते. त्यांचे हे आकर्षण लक्षात येताच दोन्ही गटांत

चलबिचल झाली आणि गटांच्या संस्कृतिनिष्ठ नेत्यांनी खाजगी बैठकी घेतल्या. हा लव्ह जिहाद होतो काय अशी भीती त्यांना वाटू लागली. आधी ताकीद द्यावी असे ठरले. दोघांवरही हे आकर्षण पुढे जाऊ देऊ नका असा आधी सल्ला मग दबाव देण्यात येऊ लागला. पण 'प्यार किया तो डरना क्या' या उक्तीने त्यांना धारिष्ट्य आले व दोघे एकमेकांना सोडेनात. त्यांच्या संबंधांच्या पुढच्या पायरीचा अंदाज येऊ शकतो. पण ती वेळ आली नाही.

वर म्हटल्याप्रमाणे त्या जंगलाबाहेर जायला बरीच झुरळे इच्छुक होती. त्यात या दोघांच्या गटांतील काहींचा समावेश होता. त्यातील तीनशे चिठ्ठ्या टाकून निवडण्यात आली. ही निवड नेमकी त्या वेळी जाहीर झाली जेव्हा यांचा रोमान्स तापला होता. त्यांच्या दुर्दैवाने सोनेरी मादीची निवड झाली पण छोट्या लाल झुरळाची नाही. मग त्यांनी 'उद्या पहाटे दुसऱ्या वाटा, दुज्या गावचा वारा' असे समयोचित गाणे म्हणून एकमेकांचा निरोप घेतला.

निवड झालेल्यांना रवाना करण्यात आले.

ती जेथे आली तेथे आल्या आल्या त्यांच्यावर धुतले न जातील असे पांढऱ्या रंगाचे ठिपके लावण्यात आले. अंधारात हा रंग चमकत असे. म्हणजे ते परकीय आहेत हे सर्वांना दिवसरात्र कळावे. तसेच झुरळे एकत्र राहात असल्याने आलेल्या झुरळांनाही त्यांचे सहप्रवासी कळावेत.

तीनशे झुरळांचे आकार आणि रंगावार निराळे गट करण्यात आले.

पन्नास झुरळांना मानवी एकमजली, पत्र्याच्या छताच्या गरीब वस्तीत पाठवण्यात आले. तेथील कच्च्या बांधकामाच्या छोट्या घरांत प्रत्येकी पाच-दहा झुरळे. इथे झुरळे आनंदात राहिली कारण अंधाऱ्या खबदाडी खूप होत्या. घरे स्वच्छ असली तरी बाहेर कचरा खूप असे. रस्ते मातीचे होते. गरीब वस्तीतील झुरळे खाऊनपिऊन पुष्टच झाली नाहीत तर त्यांनी अनेक नवीन झुरळे जन्माला घातली आणि अंडीही घातली.

इतरांना पंचवीस मध्यमवर्गीय अपार्टमेंट्समध्ये पाठवण्यात आले. प्रत्येकी दहा, तीही एकाच गटाची. म्हणजे संघर्ष होऊ नये. अपार्टमेंट्समध्ये पाठवलेल्या झुरळांना धोक्याची सूचना देण्यात आली की अपार्टमेंटमध्ये माळ्यावर, कपाटांमागे याखेरीज त्यांना लपायला अंधारी जागा मिळणे कठीण असेल. पण तेथे खायला सहज उपलब्ध होऊ शकेल आणि अन्नही विविध प्रकारचे असेल. पण त्या इमारती सक्त शाकाहारी असल्याने त्यांना मांसाहार मिळणार नाही. माणसांना सामान्यतः झुरळे घरांत आवडत नाहीत त्यामुळे झुरळांनी रात्रीच संचार करावा. तसेच अपार्टमेंटबाहेर शक्यतो जाऊ नये. दारे, खिडक्या माणसे लगोलग बंद करतात आणि झुरळांना परत आत जाणे कठीण होईल.

नव्या ठिकाणी झुरळांना अनेक अडचणी आल्या. त्यातील प्रमुख म्हणजे माणसांबरोबर राहाणे. जंगलात माणसे क्वचितच येत. कधीकाळी एखादा वनस्पतिशास्त्रज्ञ किंवा जंगली फुलपाखरांचा अभ्यासक येत असे. अलीकडे तुरुंगातून पळालेले कैदी येत. खंडणीवसुलीसाठी पळवलेल्या लोकांना घेऊन कधीतरी ते गुंड लोकही येत. सरकारविरुद्ध सशस्त्र लढणारे काही विद्रोहीही येत पण सामान्य माणसांची वर्दळ नसे.

नैसर्गिक जंगलातून ती अचानक काँक्रीटच्या जंगलात आली. त्यांच्या आधीच्या निवसस्थानातील माती, तिचा चोवीस तास वास, स्पर्श, हिरवळ, मोकळी हवा, पाऊस, झाडे, त्यांची मुळे, बाकी सरपटणारे किडे, साप, पशू, पक्षी यांतील काहीच येथे नव्हते. होत्या त्या सरळ सपाट भिंती, कृत्रिम प्रकाश. माळ्यावरची जागा ओलसर आणि अंधारी होती पण ती अगदीच संकुचित होती.

पंचवीस अपार्टमेंट्सपैकी तीन अपार्टमेंट्स मोकळी होती. विकत घेणाऱ्याकडून सगळे पैसे आले नव्हते म्हणून बिल्डरने एका अपार्टमेंटचा ताबा दिला नव्हता. दुसऱ्या अपार्टमेंटचे कम्प्लिशन सर्टिफिकेट कॉर्पोरेशन देत नव्हते कारण अधिकाऱ्यांना लाच हवी होती. तिसरे अपार्टमेंट मालकाने एका उद्योजकाला त्याचे ऑफिस म्हणून भाड्याने दिले होते. भाडेकरू कधीच वेळेवर भाडे देत नसे आणि करारात तशी तरतूद असूनही वीज, पाणी, कॉर्पोरेशन ही बिलेही भरत नसे. इतर बावीस अपार्टमेंट्समध्ये कुटुंबे राहात असत.

एका रिकाम्या अपार्टमेंटमध्ये देवाने प्रयोग करण्याचे

ठरवले. देवाच्या लहरी मर्जीनुसार त्याने ठेवलेल्या दहापैकी दोन झुरळांची दोन माणसे केली. एक पुरुष आणि एक जरा जास्त वयाची स्त्री. झुरळांना माणसे कशी राहातात हेच माहिती नव्हते पण त्यात काही विशेष कौशल्य नाही हे लक्षात येऊन ती तेथे उदरनिर्वाह करू लागली. झुरळांची माणसे झाली तरी त्यांच्या पूर्वायुष्यातील आठवणी व सवयी शाबूत होत्या. 'आधी होता वाघ्या..' या न्यायाने ते दोघेही बाहेर जाऊन कधी उकिरड्यावरील अन्न घेऊन येत, कधी भीक मागून अन्न आणत. त्यांच्या उरलेल्या अन्नातून तिथल्या झुरळांचाही खाण्याचा प्रश्न सुटला.

रिकाम्या दुसऱ्या अपार्टमेंटमधील दहा झुरळांतील दोन झुरळांचे असेच मानवीकरण करण्यात आले. एक दुखणेकरी अतिवृद्ध बाई आणि तिच्या सेवेत २४ तास असणारा वृद्धत्वाकडे झुकलेला मुलगा असे रूपांतर झाले. बाईला दुखण्यातून आणि मुलाला घरकामातून आणि सेवेतून उसंत नसे. बाजारहाट देवाच्या क्रेडिट कार्डवर होई. देवाने मानवी शाकाहारी पाककलेची सिद्धी मुलाला दिली होती. त्यामुळे स्वयंपाकही तोच करे. त्याच्या अव्यवस्थितपणामुळे विकत आणलेला बराच भाजीपाला आणि केलेले अन्न रोज वाया जाई. ते तो फेकून देई. झुरळांना ही रोजची मेजवानी असे.

ऑफिस असलेल्या अपार्टमेंटमध्ये झुरळे आनंदात होती कारण ऑफिस कायम अस्वच्छ असे व झुरळांना खायला भरपूर मिळे. उरलेले अन्न ऑफिसचे लोक क्वचितच वेळच्या वेळी फेकून देत. साफसफाई करणारी बाई आठवड्यातून एकदा येई. ती माळ्यावर कधीच डोकावत नसे. त्यात ऑफिसमधील एकाला दारूचे व्यसन होते आणि तो बाटल्या माळ्यावर ठेवत असे. एक अर्धवट संपलेली बाटली सांडून दारू माळ्यावर पसरली. झुरळांनी दारूची चव पहिल्यांदाच घेतली. ती चढल्यावर त्यांना फारच मजा आली. नियमितपणे नाही पण जेव्हा केव्हा दारू सांडे तेव्हा झुरळे खूश होत.

बाकी अपार्टमेंट्समध्ये परिस्थिती निराळी होती,

उदाहरणार्थ, एका घरातील माणसे फारच धार्मिक होती. ती दिवसरात्र पूजाअर्चा करत असत. उदबत्त्या किंवा धूप लावत. त्यामुळे गुदमरून तेथील झुरळे अल्पावधीत मेली.

सगळी अपार्टमेंट्स सक्तीने शाकाहारी असल्याने एका अपार्टमेंटमधील लोक दारे खिडक्या गच्च लावून मासे तळत. झुरळांना मासेही प्रथमच खायला मिळाले आणि त्यांना ते आवडलेही.

एका घरात चार लहान मुले होती. त्यातील दोन मुलगे वांड होते. ते रोज घरातून भांडी, डाव, वाट्या चमचे उचलत , माळ्यावर चढत आणि मोठा आवाज करत. झुरळांना जंगलातील शांततेची सवय होती. आवाजाने ती अस्वस्थ होत.

एके दिवशी एका घरात स्वयंपाकाच्या गॅसच्या सिलिंडरचा स्फोट झाला आणि आग लागली. ती शेजारच्या अपार्टमेंटमध्येही पसरली. आगीने झुरळांवर अवचित संकट आले. माणसे तर पळून गेली आणि अग्निशामक दल आले. त्यांच्या पाण्याच्या आणि रसायनांच्या फवाऱ्याने तेथील झुरळे मेली. प्रेमिक सोनेरी झुरळही आगीत दगावले.

मुळात काहीतरी नवीन शिकायला मिळेल म्हणून झुरळे त्यांचा प्रांत सोडून या परक्या प्रांतात आली होती. त्यांना जे पाहायला मिळाले त्यातून आजारपण, आळशीपणा, बेजबाबदारपणा, अस्वच्छता आणि एकूण मानवनिर्मित प्रदूषणाचा मात्र धडा मिळाला. आतातर झुरळांना जगण्याचीही शाश्वती वाटेना.

माणसांच्या संसर्गाने झुरळांच्या मानसिक आरोग्यावर विपरित परिणाम होऊ लागला. उरलेल्या अपार्टमेंट्समधील झुरळांनी विचित्र वर्तन सुरू केले. त्यांना बजावूनही ती दिवसा माळ्यांवरून, अंधाऱ्या कोपऱ्यातून बाहेर पडत व इकडे तिकडे उडत. ती बाल्कनीमध्ये जाऊन तेथून दूषित अन्न, रोगाचे जंतू घरांत घेऊन येत. त्यामुळे या अपार्टमेंट्समध्ये अनेक रोगांचा फैलाव सुरू झाला. माणसांचे खाणे दूषित झाल्याने पोटाचे विकार त्यांना सुरू झाले. अधिक गंभीर म्हणजे टायफॉइड, कॉलरा, महारोगापर्यंत लागण झाली. एका अपार्टमेंट मालकाने कॉर्पोरेशनच्या जंतुनाशक विभागातून जंतुनाशक फवारा दिला आणि झुरळे नष्ट केली. पण सगळ्याच अपार्टमेंट्सनी ही कारवाई केली नाही. काहींनी आपलेआपण प्रयोग

करून पाहिले, काहींनी विकार अगदी गंभीर होईपर्यंत चालढकल केली. माणसांचा संसर्ग शेवटी त्यांचाच नाश करतो हे परत एकदा सिद्ध झाले. मग देव वैतागला आणि त्याने ही सगळी झुरळे कॅन्सल केली.

मग दुसऱ्या वस्तीतील झुरळांना तातडीने मूळ जंगलात पाठवण्यात आले. झुरळे आणली म्हणून मानवी वस्तीत आग, रोगराई सुरू झाली अशी अधिकाऱ्यांची खात्री पटली होती. ही अशुभ मंडळी नकोतच या निर्णयाप्रत ते आले. म्हणजे, मानवी संसर्गाने सुरू झालेल्या उत्पातांचे खापर झुरळांवर फोडण्यात आले. हेही मानवी स्वभावानुसारच. अंडी, छोटी झुरळे, आजारी आणि गर्भार झुरळे नव्या देशाने ठेवून घेतली आणि बाकी झुरळांना मायदेशी पाठवले.

खेचरे

खेचरे दोन शेजारच्या प्रदेशांत रहात होती. पहिल्यापासूनच त्यांच्यात वैमनस्य होते. एक प्रकारची खेचरे काही लाखांत ७०-७५ वर्षांपूर्वीपर्यंत साता समुद्रापालीकडच्या निरनिराळ्या देशांत राहात असत. त्यांच्या डोक्यावर दाट काळे केस असत व ती आयाळ खांद्यांवर येत असे. ते ज्या देशांत राहात तेथल्या जनावरांना आयाळ नसे, त्यांचे केसही विरळ असत आणि काळेभोर नसत. ते लाल, पांढरे, सोनेरी, पिवळे असे असत. अशा दृश्य फरकामुळे त्यांना तेथे छळ सहन करावा लागला, सामूहिक कत्तलीही झाल्या. मग वेगळ्या क्रूर जनावरांच्या एका मोठ्या युद्धानंतर त्यांच्यासाठी एक नवीन देश निर्माण करण्यात आला. प्रदेशातील आधीच्या खेचरांना तेथून जबरदस्तीने हलवण्यात आले. त्यांना शेजारच्या प्रदेशांत राहायला भाग पाडण्यात आले. या खेचरांचे केस आखूड आणि तपकिरी होते. तेव्हापासून या दोन प्रदेशांतील खेचरांत - विस्थापित आणि आगंतुक - दुश्मनी राहिली आणि ती वाढतच गेली. प्रसंगी युद्धेही झाली.

त्यात नव्या वसतिस्थानात जबरदस्तीने वसवलेल्या खेचरांसाठी खायला गवत, झुडुपे, पालापाचोळा अजिबात नव्हता. होते ते रखरखीत शुष्क वाळवंट. म्हणजे अन्नाचे दुर्भिक्ष होते. त्यांच्यासारखी खेचरे असलेले इतर बरेच देश आजूबाजूला होते. त्यातील काही श्रीमंत होते, त्या देशांतून अन्न कायम आयात करावे लागे; पण मध्ये हे शत्रूराष्ट्र होते, ते या आयातीवर प्रसंगी निर्बंध आणे. शत्रूराष्ट्र संपन्न होते. वाळवंटाचे रूप पालटण्यासाठी त्यांनी अतोनात श्रम घेतले होते. त्याबरोबरच ते आधी ज्या जनावरांच्या प्रदेशांत होते, त्या जनावरांनीही त्यांना सतत मदत केली होती. ही संपन्नताही विस्थापित खेचरांना खुपत असे.

अधिक एक घटक म्हणजे या शत्रू खेचरांचे वर्तन निराळे होते. उदाहरणार्थ, जनावरांच्या देशांतून नव्या देशात आलेल्या खेचरांना मादक पदार्थ सेवन वर्ज्य नव्हते, डोके व शरीर झाकून कोणतेच खेचर इकडे तिकडे वावरत नसे. ती विविध प्रकारचे संगीत ऐकत असत. संध्याकाळी एकत्र नाचत असत. त्यांची ही जीवनपद्धती ते ज्या देशातून या नव्या देशात आले, तेथील जनावरांचीही होती आणि पारंपरिकही. मादक द्रव्यांचे सेवन हाकलून दिलेल्या खेचरांत निषिद्ध होते. तसेच संगीत ऐकणे. त्यांच्यातील निम्मी खेचरे तर फक्त डोळे उघडे ठेवत असत आणि शरीर पूर्ण झाकत असत. त्यामुळे त्यांना नेहमीची कामे अवघड जात पण हा रिवाज कडक होता. या प्रथा काटेकोरपणे पाळल्या जात. प्रथेचे उल्लंघन म्हणजे अशा खेचराला इतरांनी लाथा घालणे, ढुश्या मारणे व जायबंदी करणे, प्रसंगी देहदंड असे. देहदंडही विशेष क्रूर असत. काही खेचरे माती उकरत व खड्डा करत. 'अपराधी' खेचराला त्यात ढकलण्यात येई आणि जिवंतपणे गाडण्यात येई. अर्थातच संपन्न खेचरांना या खेचरांबद्दल अधिकच तुच्छता वाटे.

दोन्हीकडे कट्टरपंथीय होते. संपन्न खेचरांतील कर्मठ खेचरे आपल्या आयाळीची काळजी घेत. ते आयाळीची वेणी घालत तर दरिद्री खेचरांतील कर्मठ खेचरे वरच्या ओठावरचे केस साफ करत आणि फक्त हनुवटीच्या खालचे केस वाढू देत.

या दोन खेचरांतील संघर्ष वाढू लागले. मग देवाने हस्तक्षेप करण्याचे ठरवले.

एकतर खेचर हा देवाचा आवडता प्राणी.

महत्त्वाचे कारण म्हणजे तृतीयपंथीय असल्याने त्यांना पुरुत्पादनक्षमता जवळजवळ नसतेच. पुरुषप्रधानता,

पितृसत्ताक पद्धती त्यांच्यात नसतात.त्यामुळे तद्जन्य स्त्रीवादही नव्हता. तसेच संख्याही आजच्या पिढीपुरती मर्यादित रहाते. दुसरे कारण म्हणजे खेचरे निमूटपणे काबाडकष्ट करतात, काटक असतात.

देवाने दोन्ही बाजूंच्या काही लाख खेचरांना नंदनवनात आणण्याचे ठरवले. त्या शांत प्रदेशात ती काही काळ राहिली की त्यांचे मनोपरिवर्तन होईल व त्यांना सौहार्द असणाऱ्या सहजीवनाचे महत्त्व कळेल असा विचार त्यामागे होता. देवाच्या काही निकटवर्तीयांना या योजनेबद्दल शंका होती. ही मंडळी सुधारणार तर नाहीतच पण नंदनवन मात्र उद्ध्वस्त करतील असा त्यांचा आक्षेप होता. सर्वेसर्वा असल्याने देवाने हे आक्षेप फेटाळून लावले.

त्याने काही लाख खेचरे पृथ्वीवरील वाळवंटातून नंदनवनात आणली. यातली जशी मृत्यूने कमी होतील तशी आणखी पृथ्वीवरून आणायची अशी योजना होती. नंदनवनात काम कोणालाच नव्हते, तसेच खेचरांनाही नव्हते. दरिद्री खेचरांना पृथ्वीवर वाळवंटाच्या दाहक उष्णतेत ओझी वाहत मैलोन् मैल चालणे, प्रसंगी चाबकांचे फटकारे खाणे आणि उपासमार होती. यातून त्यांची सुटका झाली. नंदनवनात ते आराम करतील अशी देवाची अपेक्षा होती. प्राथमिक गरजा भागल्याने सुरुवातीचा काही काळ खेचरे तेथे रमली व निसर्गाकडे त्यांचे लक्ष तरी जाऊ लागले. तेथे हिरवळ होती, दाट झाडी होती, झाडांवर फळे, रंगीत फुले असत, झरे आणि नद्या होते आणि हवा कायम थंड असे. तोपर्यंत त्यांना रणरणत्या उन्हात आणि वाळूत अन्न आणि पाणी यांची भ्रांत असे. भरलेले पोट, श्रम नाहीत आणि सुसह्य हवामान यामुळे त्यांचे पृथ्वीवरून आलेले पूर्वग्रह व आनुवंशिक संस्कार व्यक्त होऊ लागले.

एकतर देवाने आणताना खेचरे कोणत्या विशिष्ट प्रदेशातील आहेत हे पाहिले नव्हते. समुद्राला लागून असणाऱ्या प्रदेशातून ती आणली होती. ती वस्तुतः परस्परांशी पुराणे वैर असणाऱ्या दोन प्रदेशातील होती. देवाचा त्यांना नंदनवनात आणण्याचा एक उद्देश म्हणजे त्यांचे प्रादेशिक विभाजन मिटावे असा होता. त्यांनी त्यांचे भौतिक वैर पृथ्वीवरच सोडावे आणि फक्त देवाला 'एकमेव देव' असे मानायला सुरुवात करावी असा दुसरा उद्देश होता.

पण हे विभाजन नंदनवनातही पुढे येऊ लागले. ते त्यांच्या जुन्या पारंपरिक देवांनाच भजू लागले. त्यावरून त्यांचे वादही होऊ लागले. त्यांच्यातील अंतर्गत टोळ्याही वाढू लागल्या. कोणता इलाका कोणाचा, कोणत्या झऱ्याचे पाणी आमच्या टोळीला हवे, दिसायला कोण उजळ आणि कोण सावळा यांसारख्या मुद्द्यांवरून विवाद सुरू झाले. अर्थात नंदनवनाला भौगोलिक सीमा अशी नव्हती त्यामुळे इलाक्याचे वाद निरर्थक होते. पण तरी संघर्ष सुरू झाले. हे विवाद प्रसंगी हिंसक होऊ लागले.

एक उपाय म्हणून देवाने दोन प्रमुख समूहांना त्यांचे प्रदेश आखून दिले. त्यांनी तो प्रदेश सोडू नये असे बजावले. पण त्यातील एक प्रदेश जास्त संपन्न होता किंवा इतर खेचरांना तसा वाटला. शिवाय बलिष्ठ खेचरे गरीब खेचरांच्या जमिनीवर रोज अतिक्रमण करत असत व ती जमीन बळकावत असत. त्यामुळे त्यांच्यातील तेढ वाढू लागली. अखेर वेळ सर्वंकष युद्धापर्यंत आली.

सुदैवाने नंदनवनात एक महात्मा होता. तो अहिंसक मार्गाने परस्परसंघर्ष मिटवण्यात प्रसिद्ध होता. देवाने त्याला या दोन गटांचा सलोखा करण्याचा प्रयत्न करायला सांगितला. महात्म्याला नंदनवनात एकूण काम नव्हतेच. नंदनवनात पैसा नव्हता. राजकारणी नव्हते, कोणी कोणाचे शोषण करत नसे, हिंसाचार नव्हता, कोणीच आजारी पडत नसे, हॉस्पिटल्स नव्हती, डॉक्टर, नर्सेस नव्हते, गुन्हेगार नव्हते, पोलीस, वकील या संस्था नव्हत्या, न्यायसंस्था नव्हती, बँका नव्हत्या, कारखाने नव्हते, कामगार व त्यांच्या संघटना नव्हत्या. स्वयंचलित वाहने नव्हती, ते दाखवणारी किंवा कोणतीच दुकाने नव्हती, त्यांची दुरुस्ती करणारी गॅरेजेसही नव्हती. त्यामुळे सामाजिक वातावरण शांत व निरोगी होते. हवेचे, आवाजाचे प्रदूषण नव्हते.

महात्म्याने उत्साहाने हे काम स्वीकारले.

त्याला पृथ्वीवरचे असे संघर्ष हाताळण्याचा दीर्घ अनुभव होता, वस्तुतः त्याची शिकवण पृथ्वीवरचे संघर्ष मिटवण्यात अगदी क्वचितच यशस्वी झाली होती आणि म्हणून ती संशयास्पद होती. महात्म्याने पृथ्वीवर निराळ्या दोन खेचरांच्या गटांत सामंजस्य स्थापण्याचा प्रयोग

किमान तीस वर्षे केला होता. त्याच्या मृत्यूनंतर ७५ वर्षे झाली तरी त्या गटातील दुश्मनी कायमच राहिली नाही तर वृद्धिंगतही होऊ लागली. पण एका देशाचे पारतंत्र्य घालवून त्या देशाचे दोन देश व तीन तुकडे करणे याचे श्रेय मात्र त्याला खचितच मिळाले होते. शिवाय त्याच्या नैतिक उंचीचा तेवढा एकच नेता नंदनवनात होता.

त्याच्या अनुभवानुसार त्याने प्रथम दुबळ्या तपकिरी आणि इतर बलिष्ठ खेचरांची स्वतंत्र बैठक घेतली. पहिल्या बैठकीत जास्त करून प्रतिपक्षावर आरोप होत होते. मग त्याने अशा हजारएक बैठकी घेतल्या. महात्मा संयम आणि चिकाटीबद्दल प्रसिद्ध होताच. अशा प्रत्येकी हजाराहून जास्त बैठकींनंतर त्याने संयुक्त बैठकी घेतल्या. मुळात प्रश्न कोणाची श्रद्धा काय, कोणाचा देव 'खरा', कोणाचा देव 'उच्च' हा नसून जमिनीच्या मालकीचा होता. त्यावर महात्म्याने त्याच्या खास शैलीत उपाय सुचवला. तो म्हणजे, तपकिरी खेचरांनी त्यांचा भूभागावरचा हक्क बलिष्ठ खेचरांनी सोडावा यासाठी आंदोलन करावे. बलिष्ठ खेचरांनी तडजोड करावी व गरीब खेचरांची जमीन त्यांना द्यावी. असे केल्याने दुबळे अधिक समर्थ होतात आणि बलिष्ठ नम्र होतात असा त्याचा विश्वास होता. या योगे दोन्ही गट अधिक आध्यात्मिक प्रगती करतात. या सूचनेला बलिष्ठ खेचरांनी स्पष्ट नकार दिला. त्यांच्या मते देवाने जमीन वाटतानाच गरीब आणि बलिष्ठ खेचरांना समान जमीन दिली होती. वस्तुतः बलिष्ठ खेचरांना जास्त जमीन मिळायला हवी होती. ते फक्त ती जास्तीची जमीन ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत आहेत.

दुबळ्या खेचरांनाही हा सल्ला मान्य नव्हता कारण त्याप्रमाणे त्यांना कमी जमीन मिळाली असती. म्हणून महात्म्याने इतर उपाय सुचवले - दुबळ्या खेचरांनी सशक्त खेचरांविरुद्ध निषेध म्हणून उपोषण करावे. दुबळ्या खेचरांनी हा सल्ला हसण्यावारी नेला. प्रतिपक्षाला एरवीही आमचे मरण हवे आहे, उपोषणाने आमचे आम्ही मेलो तर त्यांच्या पथ्यावरच पडेल, त्यांना आम्हांला मारण्याचे पापही लागणार नाही. 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले, असा भूतकालीन सिद्धांत जाणा' असा घोष करत ते बैठकीतून बाहेर पडले.

मग महात्म्याने पृथ्वीवर अयशस्वी झालेला आणखी एक उपाय सुचवला. तो म्हणजे चरखा चालवणे आणि सूत कातणे. आपले वस्त्र आपण विणावे. कारण अन्नाबरोबर गरीबांच्या प्रदेशांत कपडेही बाहेरून येत असत. संपन्न खेचरांना विविध वस्त्रांची सवय होती. दरिद्री खेचरांतील निम्मी खेचरेच कपडे वापरत आणि ती सगळी एकसारखी काळी असत. निदान त्यांच्यासाठी तरी घरबसल्या वस्त्रनिर्मिती होईल असा महात्म्याचा प्रस्ताव होता. पण संपन्न खेचरांनी आम्ही असले भरड सुती कपडे वापरणार नाही असे स्पष्ट केले. त्यांना रेशमी व कृत्रिम धाग्याचे कपडेच हवे होते. ते तर चरखा अनंत काळ चालवला तरी मिळणार नव्हते. कोणावरही बळजबरी करणे महात्म्याला तत्त्वतः नामंजूर असल्याने त्याने त्यांचा नाद तेव्हासाठी सोडला पण नंतर आपण हा आग्रह धरू, आवश्यक असल्यास उपोषणही करू असे त्याने ठरवले. काही लाख दरिद्री खेचरांतील तीन-चार अपंग खेचरे या प्रयोगाला तयार झाली. मागच्या दोन पायांवर उभे राहून चरखा कसा चालवायचा हे महात्म्याने त्यांना शिकवले. वस्त्रे विणण्याने त्यांना हिंसेला वेळ मिळणार नाही, विचार निराळे येतील व स्वावलंबित्व येईल हा महात्म्याचा उद्देश होता. उमेदवार इच्छुक खेचरे चरखे चालवत 'चरखा चला चलाके, लेंगे स्वराज्य लेंगे' असे गाणेही म्हणू लागली. त्याला जोडून महात्म्याने सधन खेचरांनी केलेल्या उत्पादनावर बंदी घालावी, ती विकणाऱ्या स्थानिक दुकानांवर बहिष्कार टाकावा अशाही सूचना केल्या.

चरखा चालवायला निदान सुरुवात तर झाली असे म्हणून महात्मा नवीन उपायाचा विचार करू लागला.

त्याच्या दृष्टीने एक गोष्ट महत्त्वाची होती. ती म्हणजे दोन्ही प्रकारची खेचरे श्रद्धावंत होती. त्यांच्या श्रद्धा भिन्न होत्या पण प्रार्थना हा समान धागा होता. तो पकडून त्याने पुढच्या बैठकीत खेचरांना प्रार्थनेला बसवले व त्याच्या आवडीचे भजन म्हणायला आरंभ केला. दरिद्री खेचरांना संगीत निषिद्ध होते. तसे पहाता महात्म्यालाही कलेसाठी असणारी कला मग ते संगीत असो, नाट्य असो, नृत्य असो, चित्रकला असो त्यांची फारशी आवड नव्हतीच. त्याने आयुष्यात एक सिनेमा पहिला होता आणि तो त्यातील

सत्यवचनी राजाचा जप आयुष्यभर करत असे. तरीही त्याने हे संगीत नाही, ही प्रार्थना आहे असे सांगितल्यावर दरिद्री खेचरे प्रार्थनेला हजर राहिली. सामूहिक प्रार्थना सधन खेचरांत पूर्वीपासून होती. त्यामुळे ही प्रार्थना वेगळी असली तरी त्यांचा तिला आक्षेप नव्हता.

मात्र प्रार्थना संपताच दोन्ही गट परत मूळपदावर आले आणि भांडणे सुरू झाली. प्रार्थनेला कोण कसे उभे राहिले हे निमित्त झाले. दरिद्री खेचरांनी एका विशिष्ट दिशेला तोंड करूनच प्रार्थना करायची असा दंडक होता. कारण त्यांचे पवित्र स्थान त्या दिशेला होते. पण महात्मा त्या दिशेच्या काटकोनात बसला होता, त्यामुळे खेचरांना त्याच्याकडे तोंड करून उभे राहायला लागले, दरिद्री खेचरांच्या इच्छित दिशेकडे नाही. पुढच्या वेळेपासून आपण आपले बसणे बदलावे का असा महात्म्याने विचार केला. पण तसे केल्यास पवित्र स्थानाला पाठ दाखवावी लागली असती आणि ते तर फार मोठे पाप झाले असते. शिवाय दरिद्री खेचरे दिवसातून पाच वेळा त्यांची प्रार्थना करत. प्रत्येक वेळी ती महात्म्याबरोबर प्रार्थनेला तयार होतील का याचा भरोसा नव्हता. एकूण हाही प्रयोग फसल्यात जमा झाला.

महात्म्याने आता हात टेकले आणि देवाला आपण अपयशी झालो याची कबुली दिली.

मग देवाने क्षणार्धात खेचरांना त्यांच्या आधीच्या ठिकाणी म्हणजे वाळवंटात आदळले.

तेथे आल्यावर खेचरांना बरेच वाटले. नंदनवनात समुद्र नव्हता. खेचरांना समुद्रसान्निध्याची सवय होती. त्यांची अंतर्गत आणि बाहेरची युद्धे परत जोमाने सुरू झाली.

नंदवनातील त्यांच्या अवहेलनेचा सूड म्हणून पहिली कारवाई गरीब खेचरांनी केली. ती म्हणजे शेजारच्या शत्रू प्रदेशात घुसून हजार-बाराशे खेचरे ठार मारली. त्या प्रदेशात एक वार्षिक उत्सव चालू होता. त्यावर हल्ला करून दोन-अडीचशे खेचरांना जबरदस्तीने आपल्या प्रदेशांत आणले व लपवून ठेवले. पुढे युद्ध भडकल्यावर या गरीब प्रदेशाचा अन्न, औषधे हा पुरवठा शत्रूराष्ट्राने अगदी किमान केला. आता गरीब खेचरांनी ओलिसांचा वापर सौद्यासाठी केला. अनेक वर्षे निर्धन प्रदेशातील खेचरे सधन प्रदेश पळवून नेत असे आणि त्यांना डांबून ठेवत असे. या ओलिसांच्या बदल्यात त्या कैद्यांची सुटका व्हावी असा प्रस्ताव पुढे आला. त्या देवाणघेवाणीला सुरुवातही झाली.

तोपर्यंत युद्ध सुरू होऊन वर्षभराहून अधिक काळ लोटला होता. दरम्यान निर्धन खेचरांच्यातील क्रूर मंडळींनी काही ओलिसांना ठार मारले. त्यांचे मृत्यू सधन खेचरांच्या हल्ल्यात झाले असा दावा केला. वस्तुस्थिती गूढच राहिली. जेव्हा ओलिस हळूहळू परत करण्याची वेळ आली तेव्हा या ओलिसांचे मृतदेह पाठवण्यात आले. त्यात या खेचरांतील गहाळपणा किंवा हलगर्जीपणा किंवा हेतुपुरस्सर खोडसाळपणा म्हणा पण एका खेचराचे शव चुकीचे पाठवले गेले. ते खेचर श्रीमंतांतील नव्हतेच. ते निर्धन वस्तीचे रहिवासी होते. मग कैद्यांच्या सुटकेत अडथळा आला. दुसऱ्या पक्षाने बरोबर शव पाठवा मग कैदी सोडवू असा पवित्रा घेतला. मग चोवीस तासांत बरोबर शव पाठवण्यात आले.

सधन खेचरांनी निर्धनांचा प्रदेश सतत बॉम्बफेकीने तर उद्ध्वस्त केलाच शिवाय त्यांच्या रोजच्या येण्याजण्याच्या मार्गांखाली सुरुंग पेरले. त्यावरून चालताना त्यांचा स्फोट होत असे. बरीच खेचरे त्यात मेली किंवा कायमची अपंग झाली. आधी अन्नपाण्याचा तुटवडा होताच त्यात हे नवे संकट. इतर जनावरांच्या काही देशांचा सधन खेचरांना पाठिंबा होता तर निर्धन खेचरांना वाळवंटातील इतर खेचरांच्या देशांचा. गरीब प्रदेशातील काही हजार खेचरे ठार मारली गेली. त्यात जास्त करून निरपराध बळी होते. त्यातही कपडे घालणारी खेचरे व अगदी लहान खेचरे बहुसंख्य कारण ती फार दूर पळू शकत नसत व धनिक खेचरांच्या हल्ल्यांचे सोपे लक्ष्य असत.

अखेर शेजारच्या खेचरांची राज्ये दखल घेऊ लागली कारण संघर्षातून पळून जाणाऱ्या खेचरांचे लोंढे त्यांच्या प्रदेशात येऊ लागले. त्यांच्याबरोबरच इतर जनावरांचे दूरचे प्रदेशही जरा अस्वस्थ होऊ लागले. एका बलाढ्य जनावरांच्या म्होरक्याने तोडगा सुचवला - गरीब प्रदेशातून सगळ्या खेचरांना हाकलून द्या. आम्ही हा समुद्रकिनाऱ्याचा सगळा प्रदेश विकत घेऊ आणि जगभरच्या माजोरी जनावरांसाठी इथे एक प्रचंड पर्यटनस्थळ उभारू.

हाकललेली खेचरे शेजारच्या त्यांच्यासारख्या खेचरांच्या देशांनी स्वीकारावीत.

हा तोडगा अर्थातच गरीब खेचरांना आणि शेजारच्या त्यांच्या जातकुळीच्या असलेल्या श्रीमंत खेचरांना नामंजूर होता. जेथे या खेचरांचे विस्थापन करायचे त्या दोन देशांना बलाढ्य देश प्रचंड मदत करत असे. त्या जोरावर तो बलाढ्य देश हा सौदा या दोन देशांवर लादू पाहात होता. त्या दोन देशांमध्ये आधीच अनेक गरीब खेचरे येऊन राहिली होती. आणखी काही लाख खेचरे येणे त्यांना परवडणारे नव्हते. मध्यंतरी त्या प्रदेशातील एका निराळ्या देशात प्रचंड यादवी माजली होती व काही लाखांत खेचरे ठार मारली जाऊ लागली. तेव्हा दुसऱ्या एक श्रीमंत जनावरांच्या देशाने त्या देशातील लाखोंना आश्रय दिला होता. अशी सहृदयता अगदीच विरळा. ती देवाने दाखवली होती. ते औदार्याचे एक टोक झाले तर राहत्या देशातून त्यांना बळजबरीने हलवायचे, तेही मूठभर अमीर जनावरांच्या मौजेसाठी हे दुसरे टोक.

अरण्ये पेटवणाऱ्या वणव्याचा वारा मित्र होतो, तोच वारा पणतीची वात मिटवून टाकतो. दुर्बलाला कोणीही मित्र नसतो. या न्यायाने अमीर खेचरांनी बलाढ्य जनावरांच्या देशाशी हातमिळवणी केली. ही काही लाखांतील खेचरे या प्रदेशातूनच नव्हे तर पृथ्वीवरूनच कायमची हद्दपार करायचा कट आखला. सुरुवात म्हणून शत्रूराष्ट्र खेचरांनी गरीब खेचरांचा अन्नपुरवठा त्यांच्या नियंत्रणाखालच्या मार्गाने होत असे, तो थांबवला. त्याबरोबरच समुद्राच्या पाण्यातील मीठ काढून टाकून पाणी पिण्यायोग्य करणारा गरीब खेचरांच्या प्रदेशातील कारखाना उद्ध्वस्त केला. वैद्यकीय सुविधा तर आधीच नष्ट करण्यात आल्या होत्या. प्रथम काही आठवडे ही नाकाबंदी सुरू राहिली. त्यात जेवढे भुकेने, तहानेने मरतील ते बरेच. आणखी काही आठवड्यांनंतर विविध रासायनिक, जैविक विषबाधा किंवा मृत्यूची खात्री असणारा एखादा संसर्गजन्य रोग या वस्तीत लावायचा अशी योजना होती.

नुकत्याच झालेल्या कोविडच्या प्रादुर्भावाने या संशोधनाला गती मिळाली. सुरुवातीला कोविडचा प्रसार हवेमार्फत होत नाही असा शास्त्रज्ञांचा विश्वास होता. त्यानुसार लोकांनी एकमेकांत पुरेसे अंतर ठेवले आणि हात वारंवार धुतले तर कोविड टाळता येतो अशी World Health Organisationची शिफारस होती. त्यांनी मार्च २०२०मध्ये 'कोविड हवेमार्फत होत नाही' अशी पोस्टर्सही प्रसिद्ध केली. नंतरच्या संशोधनाने, विशेषतः चीनमधील संशोधनाने कोविड हवेमार्फत पसरतो हे सिद्ध झाले.

त्या संशोधनावर आधारित एक योजना या देशांनी बनवली. कोविडचे व्हायरस प्रथम श्रीमंत खेचरांच्या प्रदेशापासून दूरच्या गरीब खेचरांच्यात लहान प्रमाणात सोडायचे. तेथील कोविडप्रसाराचे निरीक्षण करून नंतर त्याचा विस्तार वाढवायचा.

सध्याची विशिष्ट वस्त्यांवरची बॉम्बफेक चालूच ठेवायची, त्यात जेवढी खेचरे मरतील, ते बरेच. पण बहुसंख्यांसाठी कोविड हा 'उपाय' नक्की झाला.

– चंद्रशेखर पुरंदरे
इ-मेल : ckpurandare@gmail.com

**अभिजात आणि लोकप्रिय,
अकादमिक आणि सर्वसामान्याभिमुख,
जड आणि हलकेफुलके
सर्व प्रवाह मुक्त शब्दमध्ये एकत्र येतात.**